CMYK




पान ८ विशेष

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड




www.surajyadigital.com | सोमवार दि. १४ नोव्हेंबर २०२२ | वर्ष : २१ वे | अंक : ४८ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

# महाडिक मुन्ना की पाटील-परिचारक पुन्हा ?

## आज निकाल लागणार, जिल्ह्याचे राजकारण बदलणार

सुराज्य/मोहोळ

**निवडणूक भीमा सहकारी साखर कारखान्याची असली तरी निवडणुकीत उतरले भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते. लढत एकमेकांच्या विरोधात झाली असली तरी स्वपक्षातील नेते एकमेकांच्या विरोधात उभे ठाकले. त्यातून संपूर्ण जिल्ह्याचे राजकारण ढवळून निघाले. त्यामुळे जिल्ह्यातील राजकारणाची दिशा बदलणाऱ्या या निवडणुकीचा निकाल आज लागणार असून मुन्ना महाडिक अर्थात भाजपचे खा. धनंजय महाडिक यांची सत्ता कायम राहणार की राजन पाटील-प्रशांत परिचारक या माजी आमदारांची सत्ता पुन्हा येणार हे आज ठरणार आहे.**

संपूर्ण राज्याचे लक्ष लागलेल्या मोहोळ तालुक्यातील भीमा सहकारी साखर कारखान्यासाठी चुरशीने ७८. ८६ टक्के मतदान झाले. मोहोळ मंगळवेढा पंढरपूर या तीन तालुक्यातील एकूण १९४३० पैकी १५३२३ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. या निवडणुकीतील ३५ उमेदवारांचे नशीब रविवारी मतदान यंत्रात सीलबंद झाले आहे. आता सोमवारी होणाऱ्या मतमोजणीकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. अत्यंत अटीतटीने झालेल्या या निवडणुकीत मतदार माजी आमदार राजन पाटील-प्रशांत परिचारक विरुध्द खा. धनंजय महाडिक यांच्यात कुस्ती झाली. ही निकाली कुस्ती असून या कुस्तीच्या निकालातून जिल्ह्यातील राजकारणाचा निकाल लागणार असल्यामुळे निवडणुकीच्या निकालाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

मोहोळ तालुक्यातील टाकळी सिकंदर येथील भीमा सहकारी साखर कारखान्यावर गेल्या ११ वर्षापासून खासदार धनंजय महाडिक यांची सत्ता आहे. मतदानाला सकाळी आठपासून मतदान प्रक्रियेस प्रारंभ झाला. मतदाराला चारचाकी व दुचाकीवरून आणून मतदान करून घेताना उमेदवार व त्याच्या कार्यकर्त्यांची दमछाक झाली. दुपारी दोननंतर मतदान प्रक्रियेस वेग आला. या निवडणुकीत वयोवृध्दांनी ही मतदानाचा हक्क बजावला. मतदान केंद्राला खासदार धनंजय महाडिक, कल्याणराव काळे, दिनकर पाटील, राष्ट्रवादीचे प्रदेश प्रवक्ते उमेश पाटील, सभापती विजयराज डोंगरे, लोकनेते शुगरचे अध्यक्ष विक्रांत पाटील, सिनेट सदस्य अजिंक्यराणा पाटील यांनी भेटी दिल्या. गाव पातळीवरील स्थानिक नेते मतदान केंद्र परिसरात ठिय्या मांडून होते. ज्या ठिकाणी संवेदनशील मतदान केंद्रे आहेत, त्याला वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी भेटी दिल्या.




### विरोधकाचा विरोधक आपला समर्थक

राजन पाटील- परिचारक विरुध्द महाडिक अशी लढत असली तरी या लढतीला पक्षीय रंगत आहे. परिचारक आणि महाडिक सध्या भाजपमध्ये असले तरी कारखान्यातील सत्तेसाठी ते पूर्वीपासून एकमेकांच्या विरोधात आहेत. दुसरीकडे राष्ट्रवादीमध्ये असलेले राजन पाटील पाटील भाजपच्या वाटेवर असून तेही महाडिकांचे पारंपारिक विरोधक आहेत. तिसरीकडे राजन पाटील आणि उमेश पाटील हे राष्ट्रवादीमध्ये असले तरी एकमेकांचे विरोधक आहेत. त्यामुळे साहजिकच विरोधकाचा विरोधक हा आपला समर्थक या नात्याने भाजपचे परिचारक व राजन पाटील एका बाजूला एकत्र आले. त्यांच्या विरोधात उमेश पाटील आणि महाडिक एकत्र आले. त्यामुळे या निकालातून या नेत्यांच्या राजकिय भूमिकेचाही निकाल लागणार आहे.

### यांची प्रतिष्ठा पणाला

या निवडणुकीमुळे खा. धनंजय महाडिक, माजी आ. राजन पाटील, प्रशांत परिचारक, राष्ट्रवादीचे प्रवक्ते उमेश पाटील, सभापती विजयराज डोंगरे, माजी मंत्री लक्ष्मण ढोबळे, विठ्ठल कारखान्याचे अध्यक्ष अभिजित पाटील, मंगळवेढ्याचे आ. समाधान आवताडे, विठ्ठलचे माजी अध्यक्ष भगीरथ भालके, माजी उपसभापती मानाजी माने, राष्ट्रवादीचे प्रदेश चिटणीस रमेश बारसकर, चंद्रभागा कारखान्याचे अध्यक्ष कल्याणराव काळे, जनहित शेतकरी संघटनेचे प्रभाकर देशमुख, यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे.




### दोन मतदान केंद्रावर १०० टक्के मतदान

भीमा कारखान्यासाठी सर्वाधिक मतदान हे भीमा कारखाना कॉलनी आणि विरवडे बुद्रूक मतदान केंद्रावर झाले. या दोन्ही ठिकाणी १०० टक्के मतदान झाले, त्या खालोखाल ८८. ६० टक्के मतदान फुलचिंचोली या केंद्रावर झाले. सर्वांत कमी उचेठाण केंद्रावर ६३ टक्के मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला.

### महाडिकांच्या ८० सभा

या निवडणुकीसाठी खासदार धनंजय महाडिक यांनी लहान मोठ्या मिळून सुमारे ८० सभा घेतल्या. महाडिक यांचे चुलत बंधू माजी आमदार अमल महाडिक, महाडिक यांचे सुपुत्र विश्वराज महाडिक यांच्यासह कोल्हापुरातील संपूर्ण महाडिक परिवार प्रचारात सहभागी झाले होते.

---

## पाच महिन्यापूर्वी विवाह झालेल्या तरुणीची गळफासाने आत्महत्या

### घातपाताचा संशय

सुराज्य/सोलापूर

पाच महिन्यापूर्वी लग्न झालेल्या एका २० वर्षीय विवाहितेने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना शहरातील दक्षिण सदर बाजार परिसरात शनिवारी सायंकाळच्या सुमारास घडली. मयताच्या सासरकडील मंडळींनी मृतदेह रुग्णालयात सोडून गायब झाले होते. त्यामुळे हा घातपाताचा प्रकार असल्याची तक्रार मयताच्या माहेरकडील लोकांनी पोलिसासमोर केली आहे.

मिस्बा शाहिद कुरेशी (वय २० रा. ७७८/३ उ. सदर बजार, लष्कर) असे मयत झालेल्या विवाहितेचे नाव आहे. शनिवारी सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास तिने राहत्या घरात गळफास घेतली होती. तिला खाजगी रुग्णालयात दाखल केले असता ती उपचारापूर्वीच मयत झाली. अशी नोंद सदर बजार पोलिसात आहे.



विजयपूर (कर्नाटक) येथील बेपारी यांची मुलगी मिस्बा हिचा विवाह सोलापुरातील शाहीद कुरेशी याच्या सोबत गेल्या २२ मे रोजी विजापूर येथे झाला होता. विवाह नंतर तिचा पती शाहिद कुरेशी, सासू रजिया, दीर निजाम कुरेशी याच्यासह ७ जण तिला पैशाच्या कारणावरून शारीरिक आणि मानसिक त्रास देत होते. काल रात्री मयताचे चुलते इस्माईल बेपारी यांना मुलगी रुग्णालयात दाखल असल्याचे समजले समजले. तेव्हा सर्वजण सोलापुरात येऊन रुग्णालयात गेले होते. त्यावेळी मयत मिस्बा हिच्या माहेरकडील कोणीही त्या ठिकाणी हजर नव्हते. आपल्या मुलीने आत्महत्या केली नसून तिचा तिची हत्या करण्यात आली. त्यामुळे त्यांच्यावर खुनाचा गुन्हा दाखल करावा. असा अर्ज मताचे चुलते इस्माईल बेपारी (रा. विजयपूर) यांनी सदर बाजार पोलिसांकडे दिला. शासकिय रुग्णालयात शवविच्छेदन झाल्यानंतर मिस्बाचा मृतदेह माहेरकडील लोकांनी विजयपूर येथे अंत्यसंस्कारासाठी नेला आहे.

शवविच्छेदनाचा अहवाल आणि मयताच्या नातेवाईकांची तक्रार दाखल झाल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. प्राथमिक तपास महिला हेडकॉन्स्टेबल मंजुळा वाघमोडे या करीत आहेत.

---

### शिक्षिका आईचा अभ्यासासाठी तगादा

## पंढरपुरातील मुले घर सोडून गेली कुर्डूवाडीला

सुराज्य/पंढरपूर

आई वडील सातत्याने अभ्यास कर असा रेटा लावल्यामुळे पंढरपूर शहरातील प्रतिष्ठित कुटुंबातील दोन सख्खे भाऊ घर सोडून निघून गेले होते. पंढरपूर पोलिसांनी तांत्रिक मदत घेऊन एका तासाच्या आत मध्ये सदर बालकांचा तपास केला त्यांना कुर्डूवाडी येथून पकडले आहे.

पंढरपूर शहरातील एका खासगी शाळेमध्ये शिक्षिका म्हणून काम पाहणाऱ्या महिलेचे दोन्ही मुले वय वर्षे ८ आणि १२ ही तेथेच शिक्षण घेतात. मात्र घरी आई वडील सातत्याने अभ्यासाचा तगादा लावतात म्हणून दोन्ही भावंडे घर सोडून निघून गेली होती. आईने तात्काळ पोलिसांना खबर देताच पोलिसांनी तांत्रिक मदतीच्या सहाय्याने त्यांचे लोकेशन घेतले. ते कुर्डूवाडी रेल्वे स्टेशन येथे मिळून आले. पोलिसांनी त्यांना ताब्यात घेऊन आईच्या ताब्यात सुखरूप दिले. ही कामगिरी पोलीस निरीक्षक अरुण फुगे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस हवालदार सूरज हेंबाडे, पोलीस नाईक सुजीत जाधव, पोलीस नाईक प्रसाद औटी, पोलीस नाईक राकेश लोहार, सायबर शाखेचे पोलीस कॉन्स्टेबल अनवर आतार यांनी केली आहे.

---

## टँकरच्या धडकेने दुचाकीवरील विवाहितेचा मृत्यू; वडील जखमी

**सुराज्य/सोलापूर** : विवाहित मुली सोबत दुचाकी वरून जाताना पाणी टँकरच्या धडकेने दुचाकी वरील मुलगी गंभीर जखमी होऊन मरण पावली. तर वडील जखमी झाले. हा अपघात वाघोली (ता. मोहोळ) येथे शुक्रवारी सकाळच्या सुमारास घडला.

अर्चना प्रवीण कांबळे (वय २५ रा. अर्जुनसोंड ता. मोहोळ) असे मयत झालेल्या विवाहितेचे नाव आहे. ती शुक्रवारी सकाळच्या सुमारास आपले वडील रामचंद्र मल्हारी साळवे (वय ४५ रा. ढोकबाभळगाव)यांच्या दुचाकी पाठीमागे बसून बाबळगाव ते वरवटे येथे निघाले होते. वाघोली पासून काही अंतरावर पाण्याच्या टँकरच्या धडकेने दोघे जखमी झाले. त्यांना बापूसाहेब (भाऊ) यांनी सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दाखल केले. त्यापैकी अर्चना कांबळे या शनिवारी रात्री मरण पावल्या. या अपघाताची प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

---

### पाकचा आत्मविश्वास फोल ठरला

## 'साहेब' झाले जगज्जेता

सुराज्य/मेलबर्न




आस्ट्रेलियातील टी२० विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात जगज्जेतापदावर प्रबळपणे दावा करणाऱ्या पाकिस्तानचा आत्मविश्वास फोल ठरवत इंग्लंड अर्थात साहेबांच्या संघाने विजय मिळवून जगज्जेता हा बहुमान मिळवला. एकेकाळी जगावर राज्य केलेल्या इंग्लंडला साहेबांचा देश आजही म्हटले जाते. या साहेबांच्या संघाने दुसऱ्यांदा विश्वचषकावर नाव कोरून इंग्लंडची मान उंचावली. फायनलचा सामना इंग्लंडने ५ विकेट्सनी जिंकत इतिहास रचला. विश्वचषक आमचाच राहील, अशा आविर्भावात मैदानात उतरलेल्या पाकिस्तानची नशा इंग्लंडच्या खेळाडूंनी उतरवली. तब्बल १२ वर्षांनंतर ट्रॉफीवर कब्जा केला.

फायनलचा सामना एक लो स्कोरिंग मॅच असूनही ती चुरशीची पाहायला मिळाली. नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी घेतलेल्या इंग्लंडने आपला निर्णय योग्य असल्याचे दाखवत अवघ्या १३७ धावांमध्ये पाकिस्तानला रोखले. पण पाकिस्तानच्या भेदक गोलंदाजीमुळे १३८ धावांचे आव्हान गाठताना इंग्लंडची दमछाक झालीच. त्याचवेळी त्यांचा स्टार अष्टपैलू बेन स्टोक्सने एकहाती झुंज देत नाबाद ५२ धावा करत ५ गडी राखून इंग्लंडला विजय मिळवून दिला. सामन्यात सर्वप्रथम नाणेफेक जिंकत इंग्लंडचा कर्णधार जोस बटलरने आधी गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. कर्णधाराचा निर्णय बोलर्सनी अगदी योग्य असल्याचे दाखवत अप्रतिम गोलंदाजी करत अवघ्या १३७ धावांमध्ये पाकिस्तानचा वारू रोखला.

### स्टोक्सने काढली मॅच

१३८ धावांचं माफक लक्ष्य गाठतानाही इंग्लंडला फार अडचणी आल्या. त्यांची सुरुवातही खास झाली नाही. ॲलेक्स १ धाव करुन बाद झाला. मग फिलीपही १० रनांवर तर कर्णधार बटलर २६ रनांवर तंबूत परतला. मग स्टोक्स आणि ब्रुकने डाव सावरला पण ब्रुक २० रनांवर बाद झाला. स्टोक्सची झुंज कायम होती. त्याला मोईन अलीने साथ दिली, पण १९ रनांवर तोही बाद झाला. ज्यानंतर मात्र स्टोक्सने विजय पक्का करत नाबाद ५२ धावांच्या मदतीने संघाला सामना जिंकवून दिला. अप्रतिम गोलंदाजी करणाऱ्या सॅम करनला सामनावीर तसंच मालिकावीर म्हणून यावेळी गौरवण्यात आले.

---

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



काल काय ऐकलं ते खरं हाय का ?

## 'पीएम-वाणी'मधून रेशन दुकानाद्वारे आता 'वाय-फाय'सुविधा

### पहिल्या टप्प्यात सोलापूर जिल्ह्याचा समावेश, उपायुक्त आज घेणार बैठक

सुराज्य/सोलापूर

शहरी आणि ग्रामीण भागातील नागरिकांना विशेषतः विद्यार्थ्यांना घराजवळ इंटरनेटची सुविधा देण्यासाठी केंद्र शासनाच्या माध्यमातून पीएम-वाणी योजना लागू केली आहे. मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, उत्तराखंड, आंध्र प्रदेश राज्यातील रेशन दुकानांत योजनेची यशस्वी अंमलबजावणी झाल्यानंतर याच धर्तीवर महाराष्ट्रात ही योजना प्रभावीपणे राबवली जाणार आहे. या योजनेमध्ये सोलापूर जिल्ह्याचा पहिल्या टप्प्यामध्ये समावेश झाला आहे. सोमवारी पुण्यात या योजनेच्या नियोजनाची बैठक होणार आहे.

डिजिटल इंडियानंतर आता वाय-फाय क्रांती केली जाणार आहे. इंटरनेट ही सर्वांची अत्यंत महत्त्वाची गरज बनली आहे. त्यामुळे केंद्र शासनाच्या माध्यमातून वाय फाय क्रांतीच्या माध्यमातून सर्व जग एका क्षेत्राखाली आणण्याचा प्रयत्न आहे. राज्यात 'पीएम-वाणी' या योजनेद्वारे रेशनधान्य दुकानांतून वाय-फाय इंटरनेट सुविधा दिली जाणार आहे. दुकानांच्या दोनशे मीटर परिघापर्यंत अल्पदरात नागरिकांना वाय-फाय इंटरनेट मिळणार आहे. पहिल्या




टप्प्यात सोलापूरसह पुणे, सातारा, सांगली, सिंधुदुर्ग, कोल्हापूर या जिल्ह्यांचा समावेश आहे.

या योजनेंतर्गत रेशनधान्य दुकाने ही सार्वजनिक डेटा कार्यालये म्हणून घोषित केली जाणार आहेत. दुकानदारांना वाय-फाय राऊटर खरेदी करून दुकानात बसवावा लागेल. यासाठी त्यांना नोंदणी करावी लागणार आहे. त्यानंतर दुकानाच्या दोन मीटर परिसरातील नागरिक, विद्यार्थी, व्यापारी, विक्रेते आदी सर्वांनाच दररोज एक ते दीड जीबी डेटा वाय- फाय प्रणालीच्या माध्यमातून उपलब्ध करून दिला जाणार आहे. यासाठी ९९ रुपये प्रति महिना आकारणी केली जाणार जाणार आहे. या निर्णयामुळे रेशनधान्य दुकानदारांनाही उत्पन्नाच्या माध्यमातून मोठा फायदा होणार आहे.

### या योजनेचे फायदे

* रेशन दुकानादारांना उत्पन्नाचे आणखी एक साधन उपलब्ध होईल.
* इंटरनेट माध्यमातून ऑनलाईन शिक्षणाला मदत होईल.
* इंटरनेट सुविधा कमी अथवा नगण्य आहे. तिथे ही सुविधा मिळेल.
* सरकारच्या योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी मदत होईल.

### आज पुण्यात नियोजनाची बैठक

पुरवठा विभागाचे उपायुक्त डॉ. त्रिगुण कुलकर्णी यांनी पीएम - वाणी योजनेच्या नियोजनेत समावेश झालेल्या जिल्ह्यातील रेशन दुकानदार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक पुण्यातील जिल्हाधिकारी कार्यालयातील बहुउद्देशिय हॉल येथे आज बोलावली आहे. या बैठकिस सीएसी सेंटरचे वरिष्ठ अधिकारी, बीएसएनएल आणि गॅस कंपनीचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत. या योजनेच्या अंमलबजावणीबाबत धोरणात्मक निर्णय घेतला जाणार आहे.

CMYK

# दक्षिणेतला संघर्ष...

सध्या देशात बिगर भाजपाशासित अनेक राज्य सरकार आणि राज्यपालांमध्ये टोकाचा संघर्ष पाहायला मिळत आहे. काही दिवसांपूर्वी एका राज्यातून हा संघर्ष समोर आला होता परंतु आता त्यात दोन राज्यांची भर पडली आहे. राज्यपाल राजकीय हेतू ठेवून राज्य सरकारच्या कामात अडथळा निर्माण करत आहेत, असा आरोप या राज्य सरकारांकडून केला जात आहे. तामिळनाडू राज्यात राज्यपाल आणि सरकार यांच्यात संघर्ष निर्माण झाला आहे. तामिळनाडू राज्यात सत्ताधारी डीएमकेने राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे राज्यपाल आर. एन. रवी यांना हटवण्याची मागणी केली आहे. रवी यांच्यावर असंवैधानिक वर्तन आणि मोठ्या प्रमाणात विधेयके प्रलंबित ठेवल्याचा आरोप करण्यात आला आहे तर तेलंगणाच्या राज्यपाल डॉ. तमिलीसाई सौंदरराजन आणि राज्य सरकार यांच्यातील धुसपूस बाहेर पडली आहे. राज्यपाल हे 'तेलंगणा विद्यापीठ सामायिक भरती बोर्ड विधेयक २०२२' मंजूर करण्यास दिरंगाई करत असल्याचा आरोप राज्याच्या शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी केला आहे. राज्यातील १७ विद्यापीठांमध्ये शिक्षक भरतीसाठी हे विधेयक विधानसभेत मंजूर करण्यात आले आहे. मात्र, या विधेयकावर राज्यपालांनी अद्याप स्वाक्षरी केलेली नाही तर दुसरीकडे सौंदरराजन यांनी त्यांचा फोन टॅप केला जात असल्याचा आरोप केला आहे. केरळ राज्यातही येथील सरकार आणि राज्यपाल अरिफ मोहम्मद खान यांच्यात संघर्ष सुरू आहे. कुलगुरू नियुक्ती, कुलगुरू मुदतवाढ आदी बाबींपासून या वादाला सुरुवात झाली. पुढे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या सरकारने विद्यापीठ कायद्यात काही सुधारणा करून राज्यपालांच्या अधिकारांवर गदा आणली. त्यानंतर हे सुधारणा विधेयक राज्यपालांनी मंजुरी न देता रोखून धरले. याच कारणामुळे येथेही राज्यपाल-राज्य सरकार संघर्ष पाहायला मिळत आहे. देशाच्या राष्ट्रपतींकडून राज्यपालांची नियुक्ती केली जाते. संविधानाच्या कलम १५५ आणि १५६ नुसार राष्ट्रपतींची मर्जी असेपर्यंत राज्यपालांना या पदावर राहता येते.



राष्ट्रपतींनी राज्यपालांचा पाच वर्षांचा कार्यकाळ संपण्यापूर्वी मर्जी काढून घेतली तर राज्यपालांना राजीनामा द्यावा लागतो. राज्यपाल राज्यांमध्ये केंद्राचे प्रतिनिधी म्हणून काम करत असतात. राज्य मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार राज्यपाल निर्णय घेत असतात. राज्य मंत्रिमंडळाचा सल्ला राज्यपालांना बंधनकारक असतो. संविधानातील कलम १६३ नुसार राज्यपालांना काही स्वेच्छाधिकारही देण्यात आलेले आहेत. राज्यपालांचे कार्यक्षेत्र हे राज्यापुरते मर्यादित असते. भारतीय संविधानाच्या कलम १६४ नुसार राज्यपाल मुख्यमंत्र्यांची नियुक्ती करतात तर मुख्यमंत्र्यांच्या सल्ल्यानुसारच राज्यपाल मंत्रिमंडळास मंजुरी देत असतात. त्यामुळे राज्यपाल एखाद्या व्यक्तीला मंत्रिपदावरून हटवू शकत नाहीत. राज्यपाल हे राज्य मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार काम करतात. असे असले तरी राष्ट्रपतींकडून नियुक्ती झाल्यानंतर या पदावर बसलेल्या व्यक्तीला काही विशेष संविधानिक अधिकार असतात. राज्यपालांनी सही केल्यानंतर राज्याच्या विधानसभेत संमत केलेल्या विधेयकाचे कायद्यात रूपांतर होते. त्यामुळे राज्यपालांच्या सहीला विशेष महत्त्व असते. विधिमंडळ अधिवेशन बोलावणे. तसेच सर्वात जास्त आमदार निवडून आलेल्या पक्षाला सरकार स्थापनेसाठी पाचारण करणे. पक्षाला बहुमत सिद्ध करण्यास वेळ देणे, असे राज्यपालांचे काही अधिकार आहेत. केंद्रात भाजपाचे सरकार आहे तर हा वाद ज्या राज्यांमध्ये सुरू आहे, तिथे भाजपेतर पक्षांची सत्ता आहे. केंद्रात एका पक्षाची सत्ता तर राज्यांमध्ये केंद्रातील सत्ताधारी असणाऱ्या विरोधी पक्षांची सत्ता असेल तर अशा ठिकाणी हमखास वाद उत्पन्न होत असतो. हा आजचा अनुभव नाही तर परंपरागत हे चालत आले आहे. केंद्रात काँग्रेसची राजवट असताना ३५६ कलमांचा वापर करून आपल्या विरोधातील सरकारे बरखास्त करण्याचा सपाटा काँग्रेसकडून लावला जात असत. विशेष करून काँग्रेसने भाजपाच्या सरकारवर वक्रदृष्टी ठेवलेली होती. आता ३५६ कलम बाजूला ठेवत केंद्रातील भाजपा सरकारने राज्यपालांच्या खांद्यावर बंदूक ठेवत विरोधी पक्षांना हैराण करत आहे. महाराष्ट्रात काय झाले? भगतसिंग कोश्यारी यांनी महाविकास आघाडीच्या सरकारला अशाचप्रकारे त्रास दिला. राज्य सरकारच्या सल्ल्यानुसार राज्यपालांनी काम करावे, अशी घटना सांगते पण, स्वेच्छाधिकाराचा वापर करून राज्यपाल हे राज्य सरकारांना ताप देतात हे आता स्पष्ट झाले आहे. एका हाताने टाळी वाजत नाही हेही इथे लक्षात घेतले पाहिजे. राज्य सरकारे देखील मनमानीपणे कारभार करत असतात. त्याला लगाम लावला की, राज्यपालांच्या विरोधात ओरड सुरू होते. आगामी लोकसभा मिशनसाठी भाजपाचे लक्ष्य दक्षिणेकडे आहे. त्यामुळे विरोधी पक्षांना कमकुवत करण्याचा हा प्रयत्न आहे.

बालदिन

# मुलांच्या हक्काचा दिवस

**आजची मुले उद्याचे भविष्य आहेत आणि तेच भविष्याचे निर्माते आहेत. त्यामुळे त्यांना महत्त्व यावे यासाठी 'बालदिन' म्हणजेच 'चिल्ड्रन्स-डे' साजरा करण्याचे ठरले. आपल्या भारतात 'मुले म्हणजे देवाघरची फुले' असे मानणाऱ्या भारताच्या माजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जन्मदिवशी म्हणजेच १४ नोव्हेंबर रोजी 'बालदिन' साजरा केला जातो.**

नेहरूजींना लहान मुले फार प्रिय होती. मुलेही त्यांना प्रेमाने 'चाचा' म्हणत. भारताशिवाय इतर अनेक देशांमध्येही मोठ्या प्रमाणात आणि उत्साहात बालदिन साजरा केला जातो. पहिल्यांदा 'आंतरराष्ट्रीय बालदिन' साजरा करण्याची कल्पना १८५७ मध्ये अमेरिकेतील मॅसॅच्युसेट्स येथील डॉक्टर चार्ल्स लिओनार्ड यांना सुचली. त्यांनी ठरवलं की जून महिन्याच्या दुसऱ्या रविवारी बालदिन साजरा करायचा. त्याला त्यांनी 'रोझ-डे' असे नाव दिले. नंतर त्याचे नाव 'फ्लॉवर-डे' ठेवण्यात आलं आणि शेवटी 'बालदिन' असे नामकरण झाले.

लहान मुलांसाठी राष्ट्रीय सुट्टी जाहीर करणारा तुर्की प्रजासत्ताक हा पहिला देश ठरला. फार पूर्वी १९२० मध्ये त्यांनी २३ एप्रिल हा 'बालदिन' म्हणून घोषित केला. यानंतर १९२५ मध्ये जिनेव्हा येथे पहिल्यांदाच संपूर्ण जगासाठी 'बालदिन' निश्चित करण्याचा प्रयत्न करण्यात आला. येथील 'वर्ल्ड कॉन्फरन्स ऑन चाइल्ड वेल्फेअर' या कार्यक्रमात तसा प्रस्ताव ठेवण्यात आला. त्यानंतर ४ नोव्हेंबर १९४९ रोजी रशियातील वुमन्स इंटरनॅशनल डेमोक्रॅटिक फेडरेशनने ठरवले की १ जून हा दिवस 'मुलांच्या संरक्षणासाठी 'आंतरराष्ट्रीय दिवस' म्हणून साजरा केला जाईल. तेव्हापासून, बहुतेक कम्युनिस्ट देशांमध्ये १ जून हा 'बालदिन' म्हणून साजरा केला जातो.

१९५४ मध्ये पहिल्यांदाच युनायटेड किंग्डमने जगातील सर्व देशांमध्ये एकाच दिवशी एकत्रितपणे 'बालदिन' साजरा करण्याचा प्रयत्न केला. शेवटी २० नोव्हेंबर १९५९ रोजी संयुक्त राष्ट्रसंघाने 'डिक्लेरेशन ऑफ द राइट्स ऑफ द चाइल्ड' चा स्वीकार केला आणि दरवर्षी २० नोव्हेंबर रोजी जागतिक बालदिन साजरा करण्याची घोषणा केली. तेव्हापासून दरवर्षी २० नोव्हेंबर रोजी 'जागतिक बालदिन' साजरा केला जातो.

१९५९ साली झालेल्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेत बाल हक्कांची घोषणा सुद्धा करण्यात आली होती. हे बालहक्क चार वेगवेगळ्या भागांत विभागलेले असून त्यामध्ये जीवनाचा हक्क, संरक्षणाचा हक्क, सहभागाचा हक्क आणि विकासाचा हक्क यांचा समावेश आहे. असे बरेच देश आहेत, जेथे वेगवेगळ्या दिवशी बालदिन साजरा करण्यात येतो. काही देशांमध्ये एक जून, चीनमध्ये



४ एप्रिल, पाकिस्तान १ जुलै तर अमेरिकेत जून महिन्याच्या दुसऱ्या रविवारी बालदिन साजरा करण्यात येतो. याशिवाय ग्रेट ब्रिटन मध्ये २० ऑगस्ट, जपानमध्ये ५ मे या दिवशी बालदिन साजरा होतो. असे सर्व असूनही अजूनही बहुतेक देश स्वतःचा बालदिन साजरा करतात, जसे की न्यूझीलंडमध्ये मार्चच्या पहिल्या रविवारी आणि जपानमध्ये ५ मे रोजी बालदिन साजरा केला जातो. आजही ५० हून अधिक देश १ जून रोजी बालदिन साजरा करतात. यापैकी अमेरिका हे पुढारलेले राष्ट्र दरवर्षी जूनच्या दुसऱ्या रविवारी बालदिन साजरा करते.

भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू लहान मुलांवर खूप प्रेम करत. त्यामुळे त्यांच्या निधनानंतर त्यांच्या जन्मदिवशी म्हणजेच १४ नोव्हेंबर रोजी देशभर 'बालदिन' मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. मुलांचे काळजीपूर्वक आणि प्रेमाने पालन पोषण केले पाहिजे. कारण, ही लहान मुलेच देशाचे भविष्य आणि उद्याचे नागरिक होणार आहेत, तीच देशाचे सामर्थ्य आणि समाजाचा पाया आहेत, असे नेहरू यांचे म्हणणे होते. त्यांचा जन्म अलाहाबाद येथे झाला होता.

हिल्यापासूनच त्यांना छोट्या मुलांबद्दल खूप प्रेम वाटत असे. मोठेपणी त्यांच्या कोटाच्या पहिल्या बटनावर एक गुलाबाचे सुंदर फूल विराजमान झालेले दिसे. 'फूल व मूल' हीच त्यांची मोठी आवड होती. लहान मुले म्हणजे नेहरूंच्या हृदयातील अमूल्य ठेवा होता. 'मुले हीच खरी राष्ट्रीय संपत्ती आहे', या दृष्टिकोनातून नेहरूंनी आपल्या विकास कार्यक्रमात बालकल्याणाच्या उपक्रमांना नेहमीच अग्रक्रम दिला होता. मुले काय शिकतात यापेक्षा त्यांच्यावर कोणते संस्कार होतात हे पालक आणि शिक्षकांनी पाहिले पाहिजे याबाबत ते सदैव आग्रही असत. 'मुले व फुले' याबद्दलचा जिव्हाळा नेहरूंच्या रोमारोमांत भिनलेला होता. एकदा तर होळीच्या दिवशी त्यांच्या निवासस्थानी शाळकरी मुले आली आहेत हे कळताच मंत्रिमंडळाच्या बैठकीतून उठून ते तडक घरी गेले आणि मुलांवर रंग उधळण्यासाठी त्यांच्या दिशेने धावले. मुठी भरभरून त्यांनी त्या आलेल्या मुलांवर रंग उधळला. परंतु आपल्यावर रंग उधळण्यास मुले संकोच करत असल्याचे त्यांना जाणवले. म्हणून ते खाली बसले व म्हणाले, 'सांगा बघू. आता, आता मी मोठा वाटतो का? झालो की नाही लहान तुमच्या एवढा छोटा! चला आता उडवा पाहू माझ्यावर रंग! असे होते हे चाचा नेहरू! आपले वय, पद सर्वकाही विसरून ते लहान मुलांमध्ये त्यांच्यासारखे लहान होऊन मिसळत व त्यांच्यात रमून जात. २७ मे १९६४ रोजी नेहरूंचे निधन झाले.

**- मच्छिंद्र ऐनापुरे, जत, जि. सांगली.**

टुडेज ब्लॉग

# स्वत:ला आवडेल तसे जगा...

**तुम्ही स्वत:शी प्रामाणिक राहिलात तर तुम्हांला तुमच्या आयुष्यात त्याचा नक्कीच फायदा होईल यात शंकाच नाही. स्वत:साठी आयुष्य जगायला कसलीही हरकत नाही. अतियश स्वत:चसाठी जगलात तर त्यात तुम्ही कसल्याही प्रकारचे दोषी नसाल किंवा त्याची खंत अजिबात करत बसण्याची आवश्यकता नाही. स्वत:ला आवडेल तसंच जगायला पाहिजे. जन्म -मृत्यूच्या साखळीप्रमाणे जन्म तिथे मृत्यू आहेच. मृत्यू हा लॉस नसून तुम्ही तुमच्या आयुष्यात आनंदपूर्ण आयुष्य जगला नाहीत, मनासारखं जगला नाहीत तर तुम्ही आयुष्यच जगला नाहीत, याचा अर्थ जवळजवळ असाच होतो.**

आयुष्य जगण्यासाठी तुमच्या चेहऱ्यावर सदासुख, हसतमुखपणा किती आहे, त्यावर ठरतं की तुम्ही तुमचं आयुष्य किती आनंदी व सुखमय जगता. 'मरावे परि किर्तीरुपी उरावे' असे म्हणतात हे पण तितकंच खरे आहे, परंतु स्वत:च्या आयुष्याची माती करुन नव्हे. सोशल मीडियावर दररोज खूप सुविचार पोस्ट होत असतात, परंतु त्याचा वापर कुठे व केंव्हा व्हावा, असे ज्याला कळले त्यालाच आयुष्य कळाले. आपण स्वत: व आपला परिवार अगोदर व नंतर बाकी समाज असा विचार हा मर्यादीत असून तुटपुंजा वाटत असला किंवा मतलबी वाटत असला तरी हे सत्य आहे. हल्ली कोणावर कितीही प्रेम करा, कितीही जीव लावा माणूस दगा देतोच आहे. प्रत्येकजण पैशांच्या अवतीभोवती घोंगावतोय, पैशांच्या जोरावर प्रेम, माया तरंगत आहे, पैशांच्या जोरावर नात्यांचे तोलमोल होत आहे, ज्याच्याकडे जास्त पैसा तो जास्त नातीगोती सांभाळतोय असे खोटेनाटे चित्र पहावयास मिळत आहे. तसे पाहिले तर पैसा हेच सर्वस्व आहे, असे कधी कधी वाटते पण जेव्हा पैशापुढे कोणीच श्रेष्ठ वाटत नाही किंवा पैशामुळे काहीच जीवनातले पान हलत नाही, तेंव्हा खरेच असे वाटते की, पैसा हेच सर्वस्व आहे. पण अशा गोष्टींचा जास्त विचार करायचा नसतो. आपले आयुष्य आनंदी जगण्यासाठी आपण जन्माला आलो आहोत, याचा प्राथमिक अंदाज आला पाहिजे. त्याच गोष्टींला प्राधान्य द्या, ज्या गोष्टींमुळे आपला परिवार दुखावला जाणार नाही किंवा आपल्या परिवाराला व स्वत:ला आपण घेतलेल्या निर्णयामुळे त्रास होणार नाही. धकाधकीच्या व स्पर्धेच्या जीवनात हल्ली आपण आपल्या आरोग्याकडे फारच दुर्लक्ष करताना दिसत आहोत. मला त्या लोकांना एक गोष्ट नक्की सांगायला आवडेल की, सर सलामत तो पगडी पचास. हे एक छोटसं वाक्य जीवनाचा अर्थ सांगून जाते की, यातच आरोग्यसंपन्न जीवनाचे सार दडलेले आहे. तुम्ही जीवनात आल्यानंतर गरीब म्हणून जन्माला आला तरी चालेल. कारण त्यात तुमची कसल्याही प्रकारची चूक नाही परंतु, तुम्ही गरीबीतच मेलात तर ही तुमची चूक आहे, असे जगातला सर्वात श्रीमंत व्यक्ती बिल गेस्ट आपल्याला त्यांच्या अनेक भाषणांमधून सांगतात. हे मला खरे वाटले व आवडले सुद्धा पण प्रत्येकजण श्रीमंत होईलच असे तर नाही. पण इतक्या श्रीमंतीमध्ये आरोग्यच नसेल तर त्या पैशांचा काय उपयोग? त्यामुळे पैसा कमवा पण कामापुरता, मी तर म्हणेन पैसा असावा नेटका कारण रात्रीची झोप ज्याला शांत व समाधानी लागते, त्यालाच जगातला सर्वात सुखी व्यक्तीमत्व मी मानलेले आहे हे माझं वैयक्तिक मत आहे. तुम्ही तुमचं आयुष्य आरोग्यदायी, आनंदाने व आपल्या परिवाराला कसल्याही प्रकारचे दु:ख न देता पूर्ण



केले असेल तर यासारखे समाधान जगात कुठेच नाही, असेच मी म्हणेन. धकाधकीच्या जीवनात पैसा कमावण्याच्या मोहामध्ये तुम्ही स्वत:ला कधीच धोका होईल, असे काम करु नका किंवा तुमच्यामुळे इतरांच्या भावना दुखावल्या जातील, असे कृत्य तुमच्या हातून घडू नये याची काळजी घ्या. मी तर म्हणेन तुम्ही महिन्यातला एक दिवस उनाड जगलात तरी चालेल. कारण, इतर दिवसांपेक्षा एक दिवस स्वत:साठी जगलात किंवा उनाड जगलात तर आयुष्य पाच वर्षांनी वाढते, असे संशोधनातून समोर आले आहे. जीवन सुखी जगा, सत्याच्या वाटेवरच जगा, समाधानी रहा, इतरांना धोका दिला असेल तर ती चूक सुधारा, माफी मागायला कधीही कमीपणा समजू नका, मी पणामध्ये जगू नका, असे जगा की तुम्ही गेल्यानंतर जनावरांच्या सुध्दा डोळ्यातून अश्रू ओघळले पाहिजेत. यात जे समाधान आहे, ते जगाच्या पाठीवर कुठेही पहायला मिळणार नाही, हे लक्षात ठेवा. लोक काय म्हणतील याचा विचार जर करत बसाल तर स्वत:वर आत्महत्या करण्याची वेळ येईल हे लक्षात ठेवा. नेहमी सत्याच्या वाटेवर चाला व निर्भिड रहा. ताठ मानेने जगाल तर तुम्हांला आयुष्यात काहीच कमी पडणार नाही आणि सर्वात महत्वाची गोष्टी म्हणजे दररोज वाचनासाठी किमान एक तास दया, खूप चांगली पुस्तके वाचा व आपल्या ज्ञानामध्ये भर टाका. स्पर्धेच्या युगात ज्ञान हेच तुमचे सामर्थ्य आहे, हे विसरु नका. जीवनात सहवास अशा व्यक्तीसोबत ठेवा की, तुमच्या आयुष्याला त्या व्यक्तीमुळे वळण लागेल व कलाटणी मिळेल. कधीही आयुष्य खोट्या समाधानासाठी जगू नका. कारण हा जगातला सर्वात मोठा स्वत:शीच केलेला घात आहे. आई वडिलांशी मरेपर्यंत इमानदारीने रहा, त्यांच्या मनाला चटका बसेल असे एकही वाक्य त्यांना बोलू नका. त्यांचा तुमच्यावरचा विश्वास हा त्यांचा श्वास असतो.

**- शंकर चव्हाण.**
**(मो. नं. ९९२१०४२४२२)**

जन्म हा अखेरचा

## धर्माचारस्थल - २



पहिला उपाय म्हणजे मौन पाळणे आणि दुसरा उपाय म्हणजे कमीत कमी बोलणे अर्थात् मितभाषी असणे. तुम्हांला चांगले, गोड बोलता येत असेल तर तुम्ही अधिक बोलायला हरकत नाही. परंतु, तुमच्या जिभेला वाईट बोलण्याची खोड असेल तर मात्र तोंडातून शब्दच बाहेर पडू देऊ नये याची दक्षता घ्यावी. म्हणजे मौन धारण करावे. वाणीवर संयम ठेवूनच आपण वाणी-दोषांपासून मुक्त होऊ शकतो. वाणीने सदोदित भगवन्नामाचा जप घडला तर वाणीच्या दुर्व्यवहारापासून आपला बचाव होऊ शकतो. 'जपतो नास्ति पातकम्' असे जपाचे महात्म्य सांगितले आहे. भगवन्नामाचा जप केल्याने वाणी शुद्ध होऊन पातकाचा नाश होतो. वाणी शुद्ध झाली तर ती केवळ सत्य बोलू शकते. म्हणून आपल्या वाणीने नेहमी भगवंताचा नामजप आणि त्याचे भजन केले पाहिजे.

सत्य हे मानवाचे जीवनमूल्य आहे. आपल्या आसपास सगळीच माणसे असत्य बोलत असताना आपणच तेवढे सत्य का बोलावे? असा प्रश्न तुम्हांला पडेल. परंतु असत्य बोलण्याने माणसाची कशी दुर्गती होते हे जाणून तुम्ही असत्यापासून दूर राहिले पाहिजे. सत्य बोलताना प्रथम थोडे कष्ट पडतील, परंतु अभ्यासाने हळूहळू आपल्या वाणीत सत्य बाणवता येईल. रोज शंभर वेळा खोटे बोलण्याची सवय असेल तर खोटे बोलण्याच्या पाच वेळा टाळाव्यात. त्यामुळे खोटे बोलण्याची प्रवृत्ती हळूहळू कमी होत जाईल. तुमच्याजवळ हजारो रुपये असतील आणि त्यातले रोज पाच रुपये तुम्ही खर्च करीत राहिलात तर ते केंव्हातरी संपतीलच. त्याप्रमाणे खोटे बोलण्याची प्रवृत्ती हळूहळू कमी होते. म्हणून आपण रोज किती खोटे बोलतो ते मोजून ठेवावे. मग खोटे बोलणे कमी कमी करीत जावे. **(क्रमश:) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

## बालदिनाच्या शुभेच्छा

१४ भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांचा हा जन्मदिवस. १४ नोव्हेंबर १८८९ रोजी अलाहाबाद येथे पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्म झाला. पंडित नेहरूंना लहान मुले खूप आवडायची. ते सतत लहान मुलांच्या गराड्यात असायचे. लहान मुले हेच देशाचे भविष्य आहे.

आजचा बालक उद्याचा नागरिक आहे. तो नेहमी आनंदी, उत्साही आणि सुरक्षित असायला हवा. देशातील लहान मुले सुरक्षित तर देश सुरक्षित असे ते नेहमी म्हणत. मुलामुलींना सुरक्षित आणि प्रेमाच्या वातावरणात वाढवले गेले पाहिजे तसेच त्यांना आपले आयुष्य फुलवण्याच्या आणि पर्यायाने देशाच्या विकासात भर घालण्याच्या समान संधी मिळाल्या पाहिजेत असे त्यांचे मत होते. पंडित नेहरू हे स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान होते.

जनमानस

पंडित नेहरूंना बालकांविषयी वाटणाऱ्या प्रेमाची आठवण म्हणून हा दिवस 'बालदिन' म्हणून साजरा केला जातो शिवाय पंडित जवाहरलाल नेहरूंना मुलांविषयी वाटणाऱ्या प्रेम व जिव्हाळ्याविषयी आदर व्यक्त करण्याचा देखील हा एक मार्ग आहे. बालकांनाही आनंद घेण्याचा, मौजमस्ती करण्याचा हक्क आहे. आजचे बालक हाच देशाचे भविष्य आहे. या बालकांमधूनच देशाचे भावी सुशिक्षित तसेच मनाने आणि शरीराने आरोग्यसंपन्न असे नागरिक तयार होणार आहेत. हा हक्क मिळालेल्या नशीबवान बालकांनी आपल्या आनंदात इतरांनाही सहभागी करून घेण्याची जाणीव ठेवली पाहिजे. पालकांनीही ही जाणीव आपल्या मुलांमध्ये रुजवली तर भावी नागरिक सुज्ञ आणि समजूतदार बनतील, त्यामुळे देशाचे भविष्य उज्ज्वल होईल. बालदिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने मुलांच्या कल्याणासाठी काहीतरी करण्याचा संकल्प केला पाहिजे. देशातील सर्व मुलामुलींना बालदिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

**- श्याम ठाणेदार, पुणे.**


# ...कसा होणार समाजाचा विकास?

राष्ट्रीय ग्रंथालय आठवडा विशेष
१४ ते २० नोव्हेंबर २०२२

**ग्रंथालय हा वाचकांसाठी ज्ञानाचा महासागर आहे, आज ग्रंथालयाशिवाय शिक्षण व सुसंस्कृत समाजाची कल्पनाच करता येत नाही. आपल्या सर्वांच्या जीवनात ग्रंथालयाचे अमूल्य योगदान आहे. आयुष्याच्या प्रत्येक वळणावर, प्रत्येक अडचणीत पुस्तकं माणसाशी खऱ्या मित्रासारखी सोबतीला असतात. हे तेव्हाही सोबत असतात जेंव्हा आपल्याला कोणी साथ देत नाही. ज्यांना जीवनात ग्रंथालयाचे मूल्य समजले नाही, त्यांनी उत्कृष्ट जीवन जगलेच नाही. ग्रंथालये वाचकांना त्यांचे जीवन सोपे, सुलभ, उज्ज्वल आणि प्रगतीच्या मार्गावर जाण्यासाठी सतत प्रेरित करून एक चांगला मार्ग तयार करतात. ग्रंथालयांचे जाळे जगभर पसरलेले आहे, ग्रंथालयांच्या विकासासाठी सर्वात आवश्यक म्हणजे तज्ञ कर्मचारी, योग्य वाचन साहित्य आणि पुरेसा निधीसह उत्कृष्ट व्यवस्थापन. विकसित ग्रंथालये वाचकांना उत्तम सेवा देऊन देशाच्या विकासात मोलाचे योगदान देतात. ग्रंथालय हे शिक्षण केंद्रात ज्ञानाचे मुख्य स्त्रोत म्हणून ओळखले जाते. देशात दरवर्षी १४ ते २० नोव्हेंबर रोजी राष्ट्रीय ग्रंथालय आठवडा मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. आज अत्याधुनिक लायब्ररी आपल्या मोबाईलमध्ये सुद्धा समाविष्ट झाल्या आहेत. एका क्लिकवर आपल्याला जगभरातील ग्रंथालयांमध्ये सहज प्रवेश मिळतो.**

परदेशाप्रमाणे आपल्या देशातील ग्रंथालयांचे चित्र बरेच बदलले आहे. देशातील आयआयटी, आयआयएम, एम्स यांसारख्या मोठ्या शैक्षणिक संस्थांची ग्रंथालये जागतिक दर्जाची आहेत. अनेक खासगी शैक्षणिक संस्थाही ग्रंथालयांच्या विकासाकडे विशेष लक्ष देतात, पण सर्वत्र असे नाही. आजच्या युगात पैशाला अधिक महत्त्व दिले जाते आणि ग्रंथालय हे पैसे कमविण्याचे केंद्र नाही, त्यामुळे कदाचित त्याचे महत्त्व कमी मोजले जात आहे.

आज देशात मोठ्या प्रमाणात ग्रंथालये आपल्या अस्तित्वाची लढाई लढत आहेत. आर्थिक चणचण आणि कुशल कर्मचाऱ्यांची कमतरता यामुळे अनेक ग्रंथालये नाममात्र राहिली आहेत. अनेक ग्रंथालयांमध्ये सेवेच्या नावाखाली फक्त मोजकी वर्तमानपत्रे उपलब्ध असतात, तर अनेक ग्रंथालयांमध्ये चांगल्या देखभालीअभावी मौल्यवान वाचनसाहित्य खराब होत आहे. अनेक ग्रंथालयांच्या इमारती मोडकळीस आल्या आहेत तर अनेक ग्रंथालये कुशल कर्मचाऱ्यांअभावी वाईट अवस्थेत आहेत. अनेक ग्रंथालयांमध्ये



खुर्ची, टेबल, कपाट, खिडकी, दरवाजाही तुटलेल्या अवस्थेत पाहायला मिळतात. अनेक ग्रंथालयांच्या भिंतींना भेगा पडल्या आहेत तर अनेक ग्रंथालयांमध्ये पावसाळ्यात छतावरून पाणी टपकते. अशा समस्यांमुळे जगाला दिशा दाखविणारा ग्रंथालय आज दिशाहीन होत आहे. अनेक मोठी ग्रंथालये केवळ चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या भरवश्यावर चालत आहेत. अनेक राज्यांच्या सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये, शाळा-महाविद्यालयांमध्ये, महानगरपालिका किंवा इतर सरकारी क्षेत्रातील ग्रंथालयांमध्ये तज्ञ कुशल कर्मचाऱ्यांची भरती होऊन काही वर्षे नाही, तर अनेक दशके उलटून गेली आहेत. जबाबदार विभाग किंवा प्रशासनाला ग्रंथालयांचे महत्त्व कळत नाही, असे नाही. ग्रंथालयांचे महत्त्व समजून निधींची उपलब्धता आणि तज्ञ कर्मचारी भरती लवकरच केली जाईल, असे आश्वासन त्यांच्याकडून सातत्याने मिळत असते. दिवस, महिने, वर्षे उलटतात, ग्रंथालयांची अवस्था आणखी बिकट होत जाते, कर्मचारी निवृत्त झालेतरी नवीन कर्मचारी भरती होत नाहीत. देशातील अनेक ग्रंथालयांची इतकी वाईट अवस्था असताना तेथील वाचकांची ज्ञानाची तहान कशी भागणार, हा अतिशय गंभीर प्रश्न आहे. जगात असेच देश विकसित झाले आहेत. ज्यांनी शिक्षण क्रांतीचे महत्त्व समजून शिक्षणासोबतच त्यांना वाव देण्याकरिता ग्रंथालयांची उन्नती केली. कारण ग्रंथालये शिक्षणाचे आधारस्तंभ आहेत, वेळेची बचत करून मनुष्याला योग्य दिशा देऊन ज्ञानी बनवतात. जगातील महान व्यक्तिमत्त्वांचे सोबती म्हणून पुस्तके ओळखली जातात. जे पुस्तकांशी मैत्री करतात, ते आयुष्यात कधीच एकटे नसतात. शालेय शिक्षणाच्या पहिल्या टप्प्यापासून ते आयुष्याच्या शेवटपर्यंत ग्रंथालये मानवाला मार्गदर्शन करतात. जिथे शिक्षकालाही ज्ञानाची तळमळ असते, ते केंद्र म्हणजे ग्रंथालय. जीवनाचा अविभाज्य घटक असलेले ग्रंथालय आज उपेक्षेचे केंद्र बनले आहे.

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे जबाबदार विभागाने ग्रंथालयांकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलणे आहे. ग्रंथालयांमध्ये कुशल कर्मचाऱ्यांच्या भरतीकडे विशेष लक्ष देण्याची नितांत गरज आहे. ग्रंथालयातील सेवा-सुविधा आणि उपयुक्तता टिकवून ठेवण्यासाठी जबाबदार अधिकारी विभाग, व्यवस्थापन आणि प्रशासन यांनी भर देणे गरजेचे आहे. योग्य अर्थसंकल्पाअभावी अनेक ग्रंथालये नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत, त्यामुळे ग्रंथालयांचे योग्य व्यवस्थापन आणि विकास करण्यासाठी योग्य निधीची सतत उपलब्धता असायला हवी. विशेषत: ग्रामीण भागात जास्त लक्ष देण्याची गरज आहे. देशातील प्रत्येक नागरिकापर्यंत ग्रंथालयाचा लाभ पोहोचल्यास देशातील विकासाचे खरे चित्र दिसून येईल. **- डॉ. प्रितम गेडाम, नागपूर**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# थकलेला श्रीविठुराया गेला विश्रांतीला, अत्यंत तेजस्वी चेहरा भक्तांना भावला



✔ सुराज्य/पंढरपूर

कार्तिकी यात्रेसाठी आलेल्या लाखो भाविकांना सलग १७ दिवस अहोरात्र दर्शन देत उभ्या राहिलेल्या परब्रह्म पांडुरंगाला रविवारपासून नियमित विश्रांती मिळणार असून देवाच्या प्रक्षाळ पूजेनंतर राजोपचारालाही सुरुवात झाली.

कार्तिकी यात्रेसाठी २८ ऑक्टोबर रोजी देवाचा पलंग काढून २४ तास दर्शनाला सुरुवात झाली होती. प्रक्षाळ पूजा संपली असून देवाचे सर्व राजोपचार सुरु होणार आहेत. उभ्या महाराष्ट्रात लोकदेवता म्हणून ख्याती असलेल्या सावळ्या विठुरायाच्या महिमेचे वर्णन किती म्हणून करायचे?या प्रक्षाळ पूजेची आख्यायिका अशीच भक्तांचा उत्साह वाढवणारी आहे.

सलग १७ दिवस अखंड दर्शन देऊन थकलेल्या विठुरायाचा थकवा आणि शिणवटा घालविण्यासाठी ही प्रक्षाळ पूजा करायची शेकडो वर्षाची परंपरा आहे. रविवारी भल्या पहाटे विठुरायाच्या चरणाला लिंबू आणि साखर चोळण्यात आली. यानंतर संपूर्ण मंदिर धुऊन स्वच्छ करण्यात आले. दुपारी देवाच्या प्रक्षाळ पूजेस सुरुवात झाली. मंदिर समितीचे सदस्य शकुंतला नांदगिरे यांच्या हस्ते श्रीविठ्ठलाची तर अतुलशास्त्री भगरे गुरुजी यांच्या हस्ते रुक्मिणीमातेकडे पूजा करण्यात आली. या पूजेत पारंपरिक पध्दतीने ब्रम्ह वृंदांच्या उपस्थितीत मंत्रपठण करीत देवाला गरम पाण्याने रुद्राभिषेक करण्यात आला.

### वारकरी संप्रदायाची अशीही भावना...

रुद्र आवर्तनाच्या जयघोषात देवाला दही, मध, साखर आणि शेवटी दुधाचा अभिषेक शंखातून करण्यात आला. पंचामृत स्नान झाल्यावर देवाला गरम केशर पाण्याने स्नान घालण्यात आले. यामुळे देवाच्या थकलेल्या शरीराला उत्साह प्राप्त होत असल्याची भावना वारकरी संप्रदायात असते. यानंतर देवाला पारंपरिक मौल्यवान अलंकार परिधान करण्यात आले. यात मस्तकी सुवर्ण मुकुट, गळ्यात अनमोल कौस्तुभ मणी, भाळी निळ्या हिऱ्यांचा नाम, दंडाला दंड पेट्या आणि गळ्यात अत्यंत मौल्यवान मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, तीन पदरी सुवर्ण तुळस माळ, मारवाडी पेठ्यांचे हार, मोठा लफ्फा आणि मोत्याचे कंठे घालण्यात आले. कानाला हिरेजडित मत्स्य जोड अशा पोशाखात नटलेल्या विठुरायाचे सौंदर्य अतिशय खुलून दिसत होते. रुक्मिणी मातेलाही वाक्या, तोडे, तानवड, मोहरा आणि पुतळ्यांच्या माळा, हायकोल, चिंचपेटी व पुतळ्याची माळ असे पारंपारिक दागिन्यांनी सजविण्यात आले होते. या पूजेनंतर देवाला पुरणपोळीचा महानैवेद्य दाखविण्यात आला आणि देवाची महाआरती करण्यात आली.

कोरोना संकटामुळे विठ्ठल मंदिर भाविकांसाठी बंद असले तरी देवाच्या जोडीने गेली १७ दिवस अहोरात्र उभी असलेली जगन्माता रुक्मिणी मातेचीही पवमान अभिषेकाने प्रक्षाळ पूजा करण्यात आली. यावेळी रुक्मिणी मातेलाही हिरे मणक्यांच्या पारंपरिक दागिन्याने सजविण्यात आले होते. अखंड परिश्रमानंतर देव आपल्या शयनकक्षात विश्रांतीसाठी जाणार म्हटल्यानंतर देवाचा पलंग बसविण्यात आला. सुगंधी फुलांनी मंदिर आणि देवाचे शयनकक्ष सजविण्यात आला होता. पुणे येथील भाविक अमोल शेरे आणि मोहिते यांनी ही सजावटीची सेवा दिली. देवाचा शिणवटा घालविण्यासाठी पारंपरिक पध्दतीने बनविण्यात आलेला १४ आयुर्वेदिक वनस्पतींचा काढा देवाला देऊन देवाची शेजारती होऊन देव विश्रांतीला गेले. देवाला हे सर्व उपचार होत असताना देवाच्या चेहऱ्यावरील भाव बदलत जात असल्याची अनुभूती पदोपदी जाणवत राहते. सुरुवातीला थकलेला देवाचा चेहरा पूजेनंतर मात्र अत्यंत तेजस्वी आणि प्रसन्न झाल्याचे पाहावयाला मिळते. सोमवारपासून विठ्ठल रुक्मिणीचे राजोपचार नियमितपणे सुरु होणार आहेत.



## तिऱ्हे ग्रामपंचायतीतर्फे जि.प. शाळेस साहित्य वाटप

✔ सुराज्य/उत्तर सोलापूर : उत्तर तालुक्यातील तिऱ्हे ग्रामपंचायतिच्यावतीने पंधराव्या वित्त आयोगातून जिल्हा परिषद शाळेतील दोनशे विद्यार्थ्यांना गणवेश, शालोपयोगी साहित्य, खेळणी व इतर साहित्य सरपंच नेताजी भारत सुरवसे, चेअरमन भास्कर सुरवसे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. यावेळी ग्रामसेवक शिंदे, शालेय शिक्षण समिती अध्यक्ष अनिल वाघमारे, मुख्याध्यापक कोळी सर, उपसरपंच- मारुती लवटे, गोवर्धन जगताप, अजय सोनटक्के, संजय राठोड, तुकाराम मल्लाव, अशोक राठोड, प्रदीप सुरवसे, गुरुदेव गायकवाड, अरविंद वाघमारे, दत्तात्रय जाधव, मधुकर आदटराव, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचा शिक्षक स्टाफ, जि. प. शाळा माने वस्ती शिक्षक स्टाफ, जि. प. शाळा तिऱ्हे तांडा शिक्षक स्टाफ, गावातील सर्व अंगणवाडी शिक्षक, सेविका, कर्मचारी, विद्यार्थी, ग्रामस्थ उपस्थित होते. जवळपास विद्यार्थ्यांना गणवेशाची व शालेय साहित्याची वाटप करण्यात आले. गावातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी जि. प. शाळा तिऱ्हे, तिऱ्हेतांडा, मानेवस्ती-संगणक, स्पीकर सेट साहित्य, ढ ोल, ताशा, लेझीम, टेबल खुर्ची कपाट बॅटबॉल, फुटबॉल, हॉलीबॉलसह विविध साहित्य वाटप करण्यात आले.

## शेंडगे यांची करिअर कट्टाच्या जिल्हा प्रसारकपदी निवड

✔ सुराज्य/सोलापूर : पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांची करिअर कट्टा उपक्रमाच्या जिल्हा प्रसारकपदी निवड झाली आहे. करिअर कट्टा हा उपक्रम महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्याकडून राबविण्यात येत आहे. युवकांच्या सर्वांगिण विकासासाठी विविध उपक्रम करिअर कट्टाच्या माध्यमातून राबविण्यात येतात. प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांच्या निवडीचे संस्थेचे अध्यक्ष काशीनाथ गड्डम, उपाध्यक्ष प्राध्यापक श्रीनिवास कोंडी, सचिव दशरथ गोप, सहसचिवा संगीता इंदापुरे, खजिनदार नागनाथ गंजी, विश्वस्त मंडळ, प्राध्यापक वर्ग व कार्यालयीन कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.



## प्रा. धिमधिमे यांना पीएचडी प्रदान

✔ सुराज्य/सोलापूर : प्रा. डॉ. रवींद्र साहेबराव धिमधिमे यांनी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठास शरीरक्रियाशास्त्र या विषयात सादर केलेल्या ॲसेसमेंट ऑफ प्रोफेशनल टिचर्स वुईथ क्रायटेरिया ऑफ आयडियल टिचर फ्रॉम चरकसंहिता ॲन्ड फाईन्ड दि कोरिलेशन वुईथ देह प्रकृती' या मार्गदर्शक डॉ. नंदिनी दिलीप धारगळकर यांच्या मार्गदर्शनाखाली सादर करण्यात आलेल्या शोधप्रबंधास मान्यता मिळून पीएचडी ही पदवी प्रदान करण्यात आली. सोलापूर शहर जिल्ह्यातून वैद्यकीय क्षेत्रात सर्व मागासवर्गीयांतून सर्वप्रथम पीएचडी होण्याचा बहुमान यांनी प्राप्त केला आहे. सध्या डॉ. रवींद्र धिमधिमे हे शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, उस्मानाबाद येथे शरीरक्रियाशास्त्र प्राध्यापक व विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत.

## श्री मल्लिकार्जुन हायस्कूलमध्ये आझाद यांची जयंती साजरी

✔ सुराज्य/सोलापूर : मजरेवाडी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री मल्लिकार्जुन हायस्कूलमध्ये स्वतंत्र भारताचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांची जयंती साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक वैजिनाथ हत्तुरे होते. प्रमुख अतिथी अण्णाराया तुप्पद होते. अध्यक्ष व प्रमुख अतिथी यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रशालेचे मुख्याध्यापक वैजिनाथ हत्तुरे यांनी आपल्या मार्गदर्शनात मौलाना अबुल कलाम आझाद हे थोर स्वातंत्र्यसेनानी होते. यावेळी प्रशालेतील पर्यवेक्षक गिरमल्ला बिराजदार, दत्तात्रेय अगरखेड, विद्याधर हुलगेरी, संतोष हिरेमठ, सविता कुलकर्णी, बाबूराव कलशेट्टी उपस्थित होते.

## भारत उर्दू विद्यालयात शिक्षण दिन साजरा

✔ सुराज्य/सोलापूर : मजरेवाडी येथील भारत उर्दू विद्यालयात स्वतंत्र भारताचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या जयंतीनिमित्ताने शिक्षण दिन साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी भारत उर्दू विद्यालयाच्या मुख्याध्यापिका शाहीन अत्तार होत्या. कार्यक्रमाच्या सुरुवातीस रिजवाना काटगावकर यांनी उपस्थितांचे स्वागत व प्रास्ताविक केले. तद्नंतर मान्यवरांच्या हस्ते आझाद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमात तस्लीम मुर्शद, मंगलगिरी मरयम या विद्यार्थ्यांनी तसेच सहशिक्षिका शहेनाज सय्यद यांनी मौलाना आझाद यांचे जीवनचरित्र मनोगतातून व्यक्त केले.

## रॉकबॉल व्हॉलीबॉल स्पर्धेमध्ये विवेकानंद प्रशालेचे यश

✔ सुराज्य/सोलापूर : ४ व ५ नोव्हेंबर २०२२ रोजी गिरिजाबाई ढोबळे महिला महाविद्यालय, जुळे-सोलापूर येथे संपन्न झालेल्या राज्यस्तरीय रॉकबॉल व्हॉलीबॉल स्पर्धेमध्ये सोलापूर जिल्हा मुलींचा संघ विजयी ठरला. या विजयी संघामध्ये स्वामी विवेकानंद प्रशालेच्या चार मुलींचा सहभाग होता. आरती लक्ष्मीनारायण चारगुंडी, श्रावणी राजेश चारगुंडी, अक्षया भास्कर अल्ली, अर्पिता तुळशीदास कोलकुंदी. या विद्यार्थिनींनी या स्पर्धेत चमकदार कामगिरी करीत सोलापूर संघास विजेतेपद पटकावून दिले. विजयी खेळाडूंचे अभिनंदन नॅब संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश यलगुलवार, जनरल सेक्रेटरी के. डी. पाटील, जनरल सेक्रेटरी शशीभूषण यलगुलवार, मुख्याध्यापिका सीमा श्रीगोंदेकर यांनी अभिनंदन केले. या सर्व खेळाडूंना क्रीडा शिक्षक सुभाष माने, गणपती कोळी व प्रशिक्षक खंडू शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

# टॉवेल उत्पादन करणाऱ्या कारखान्यास वायरच्या शॉर्टसर्किटने लागली आग ; ५ कोटी ५० लाखांचे नुकसान

✔ सुराज्य/सोलापूर

शहरातील अक्कलकोट रोड एमआयडीसी परिसरातील नीलम नगर येथे असलेल्या मुनोत टेक्साईल या टॉवेल उत्पादन करणाऱ्या कारखान्यास शनिवारी सायंकाळी आग लागून जवळपास पाच कोटी पन्नास लाखाचे नुकसान झाले.

ही आग वयरच्या शॉर्टसर्किटमुळे लागली असल्याची फिर्याद सुमित टेक्साइल्स व मुनोत टेक्स्टाईल चे मालक सुमित वसंत मुनोत (रा.रेल्वे लाईन सोलापूर) यांनी रविवारी सायंकाळी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिली. या आगीत कारखान्यामधील मोठमोठ्या महागड्या मशीन, आठ ते दहा लूम्स, कुलर मशीन,कोठावधी रुपयाचे तयार माल,कच्चामाल,तसेच संपूर्ण कारखाना आगीत जळून भस्मसात होऊन जवळपास पाच कोटी पन्नास लाखाचे नुकसान झाले.ही आग विझवण्यासाठी महापालिकेच्या पाच ठिकाणाहून अग्निशामक दलाच्या गाड्या तैनात केल्या होत्या. तसेच खाजगी पाणी वाहतूक करणाऱ्या कडून २० ते २५ बंबाने पाण्याचा मारा करून दहा ते बारा तासात ही आग आटोक्यात आली.असे या फिर्यादीत म्हटले आहे.या घटनेचा अधिक तपास पोलीस निरीक्षक वळसंगे करीत आहेत.



## दिव्यांगाना मालमत्ता करात ५० टक्के सूट

✔ सुराज्य/सोलापूर

महानगरपालिकेच्या वतीने विविध योजना ऑनलाईन पध्दतीने करण्यात येत आहे. यामध्ये दव्यांग व्यक्तींना मिळकत करा मध्ये ५०% टक्के सूट मिळणार आहे. मात्र पूर्ण कर भरल्यानंतरच ही सूट मिळणार असल्याचे उपायुक्त विद्या पोळ यांनी सांगितले.

दिव्यांग कल्याण विभाग व जनसंपर्क विभागाच्या वतीने दिवंग्यांना देण्यात येणाऱ्या या सर्व योजनेच्या लाभ ऑनलाइन करण्यात आले आहेत. राज्यस्तरीय/राष्ट्रीय स्तर आंतरराष्ट्रीय स्तरावरील दिव्यांग खेळाडूंना प्रोत्साहन भत्ता देणे, दिव्यांगना उदरनिर्वाह(नवीन अर्ज) भत्ता देणे, दिव्यांग व्यक्तींना मिळकत करा मध्ये ५०% परताव देणे, दिव्यांग व्यक्तींना नागरिक वाहतूक व्यवस्थेत प्रवासाकरिता सवलत देणे, दिव्यांगाकरिता नोंदणीकृत शैक्षणिक संस्थांना मालमत्ता करामध्ये ५०% सवलत देणे आधी



सर्व सुविधा सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने सुरू करण्यात आले आहे. यासाठी ऑनलाईनद्वारे अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. दिव्यांग मयत अनुदान अर्ज ऑफलाइन पध्दतीने कार्यालयत अर्ज स्वीकारण्यात येईल. सोलापूर शहरातील दिव्यांग व्यक्तींनी उदर निर्वाह भत्ता योजने करिता जर या अगोदर कामगार कल्याण विभागाकडे नोंदणी केली असल्यास त्यांनी ऑनलाईन फार्म भरण्याची आवश्यकता नाही. तसेच नवीन नोंदणी हींtp:/lwpro. solapurcorporation. org या वेबसाईट वर करू शकता. अधिक माहितीसाठी सोलापूर महानगरपालिकेच्या कामगार कल्याण व जनसंपर्क कार्यालयाशी संपर्क साधावा तसेच या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन सहाय्यक आयुक्त पुष्पगंधा भगत यांनी केले.

## अल्पवयीन मुलीला पळवले

✔ सुराज्य/सोलापूर : एका सोळा वर्षाच्या अल्पवयीन मुलीला इसमाने कायदेशीर रखवालीतून फूस लावून पळून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. ही घटना दि. १० नोव्हेंबर रोजी सोलापूरात घडली. याप्रकरणी पीडित मुलीच्या वडिलांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात इसमाविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक पवार हे करीत आहेत.

## संगमनेर येथे कुऱ्हाड आणि चाकूने मारहाण; पिता-पुत्र जखमी

✔ सुराज्य/सोलापूर

दुचाकीला कट मारल्याचा जाब विचारल्याच्या कारणावरून कुऱ्हाड आणि चाकूने केलेल्या मारहाणीत वडील आणि मुलगा असे दोघे जखमी झाले. ही घटना संगमनेर (ता. बार्शी) येथील बसस्थानकाजवळ शुक्रवारी सकाळच्या सुमारास घडली.

दत्तात्रय विश्वनाथ मोरे (वय ४९) आणि त्यांचा मुलगा श्रीकृष्ण मोरे (दोघे रा. संगमनेर) अशी जखमींची नावे आहेत. त्यांना मारहाण केल्याप्रकरणी वैरागच्या पोलिसांनी विशाल मारुती हागवणे (रा. संगमनेर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. दत्तात्रय मोरे हे शुक्रवारी सकाळी गौडगाव येथे निघाले होते. संगमनेर बस स्थानकाजवळ विशाल हागवणे हा गाठ पडला आणि तू दोन दिवसापूर्वी दुचाकीला कट का मारला? असे विचारले असता त्याने घरात जाऊन कुऱ्हाड आणुन त्यांच्या डोक्यात हल्ला केला. दरम्यान त्यांचा मुलगा श्रीकृष्ण हा भांडण सोडवत असताना त्याने खिशातला चाकू काढून त्याच्या तोंडावर मारून जखमी केले. अशी नोंद पोलिसात झाली. हवालदार नाळे पुढील तपास करीत आहेत.

# सर्वसामान्यांची भाकरी महागली

### ज्वारीचे भाव प्रतिकिलो १० ते १२ रूपयांनी वाढले

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर जिल्ह्यातील बार्शी, मंगळवेढा, सांगलीतील जत तालुक्याला 'ज्वारीचे कोठार' समजले जाते. मात्र यंदा पावसाने नको त्या वेळेस लावलेल्या हजेरीमुळे शेतात जागोजागी पाणी साठल्यामुळे यंदा मोठ्या क्षेत्रावर रब्बी ज्वारीच्या पेरण्या झाल्या नाहीत. परिणामी सर्वसामान्यांची भाकरी महागली असून ज्वारीचे भाव प्रतिकिलो १० ते १२ रूपयेने वाढले आहेत.

दरवर्षी 'ऑक्टोबर हिट' सुरू होण्यापूर्वी रब्बी ज्वारीची पेरणी होते. मात्र यंदा दिवाळीपर्यंत पावसाने जोरदार हजेरी लावली. परिणामी बहुतांश ठिकाणी शेतात पाणी साचून राहिले होते. यामुळे जमिनीला वाफसा आला नाही. अनेक शेतकऱ्यांना पेरणीसाठी रान तयार करता आले नाही. यामुळे शेतकऱ्यांना ज्वारीच्या लागवडीपासून दूर रहावे लागले. याचा मोठा परिणाम



यंदा ज्वारीचे उत्पादन घटले आहे. परिणामी ज्वारीचे दर वाढले आहेत.

ज्वारीचे उत्पादन कमी झाल्याने कृषी उत्पन बाजार समितीत व बाजारात ज्वारी विक्रीसाठी कमी प्रमाणात उपलब्ध आहे. बाजारात ज्वारीच कमी उपलब्ध असल्याने ज्वारीचा एका किलोला ३८ रुपये असलेला दर ५० ते ५५ रुपयांवर गेला आहे. ज्वारीचे घटलेले उत्पादन सर्वसामान्यांची ज्वारी महाग करून गेले आहे.

पंधरा दिवसांपूर्वी तीन ते साडेतीन हजार रूपयांची ज्वारी पाच ते साडेपाच हजार रुपयेपर्यंत पोहचली आहे. ज्वारीच्या प्रतीवरून त्याचा दर प्रतिकिलो १० ते १२ रूपयांनी महागली आहे. करमाळा येथील ज्सुट ज्वारी ४० रूपयांवरून ५० ते ५५ रूपये किलो, कर्नाटकची हॅब्रीड ज्वारी ३० वरून ३८ रूपये किलो, जळगावची वसंत ज्वारी ३० वरून ४० रूपये किलो, सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा, वांगी, कामती, मंद्रुप, भंडारकवठे, छोटी आणि मोठी कामती येथील मालदांडी ज्वारी ४० वरून ५० रूपये किलो दर झाले आहेत.

### पावसामुळे उत्पादन व पुरवठा घटल्याने दरवाढ

- यंदा पावसाने मोठ्या प्रमाणात दिवाळीपर्यंत हजेरी लावली. शेतात मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. याचा परिणामी ज्वारीचे उत्पादन घेण्यात झाला असून उत्पादन कमी झाले आहे. परिणामी पुरवठा कमी प्रमाणात झाल्याने ज्वारीचे भाव वाढले आहेत.

**– विकास अगरवाल,**
अगरवाल किराणा, होलसेल ज्वारीचे व्यापारी

## मार्डी येथे गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न

✔ सुराज्य/सोलापूर : दारूच्या नशेत पत्नी बरोबर भांडण झाल्याचा कारणावरून पतीने झाडाला दोरीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. ही घटना मार्डी (ता. उत्तर सोलापूर) येथे शनिवारी रात्रीच्या सुमारास घडली. ज्ञानेश्वर भानुदास काळे (वय २२ रा. मार्डी) असे जखमींचे नाव आहे. त्याला फासातून सोडवून जितेंद्र (भाऊ) यांनी शासकिय रुग्णालयात दाखल केले. काल रात्री नऊ वाजेच्या सुमारास ज्ञानेश्वर याने घराच्या आवारात असलेल्या चिकूच्या झाडाला दोरीने गळफास घेतला होता. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

# लंपी आजाराने नुकसान; १० हजार रुपयांची मदत विचाराधीन : स्वामी

✔ सुराज्य/सोलापूर

**राज्य शासनाच्यावतीने जिल्ह्यात आतापर्यंत आम आजाराने मरण पावलेल्या (दगावलेल्या) जनावरांना राज्य शासनाकडून आर्थिक मदत दिली आहेच, परंतु जिल्हा परिषदेच्या शेष फंडातून देखील प्रत्येकी जनावराला दहा हजाराची आर्थिक मदत लवकरच शेतकऱ्यांना देण्याचे विचाराधीन असल्याची माहिती जि. प. चे सीईओ स्वामी यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.**



राज्य शासनाकडून आजपर्यंत लंपी आजाराने मरण पावलेल्या जनावरांना २ लाख ९१ हजाराची आर्थिक मदत दिली असून उर्वरित जनावरांचे पंचनामे सुरू आहेत. त्यामुळे जनावर दगावलेल्या एकही शेतकरी या आर्थिक मदतीतून वंचित राहणार नाही, याची खबरदारी संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले असून प्रत्येक ठिकाणी स्वतः जाऊन जनावरांचे पंचनामे करण्याचे आदेश संबंधित कर्मचाऱ्यांना देण्यात आले आहेत. याबाबत काल पालकमंत्री यांच्याबरोबर चर्चा झाली असून आजार कसा आटोक्यात येईल तसेच दगावलेल्या जनावरांच्या मालकांना आर्थिक मदत कशी देता येईल याबाबत विचारविनिमय बैठकीत झाला. तसेच शासनाच्यावतीने जी आर्थिक मदत होणार आहे, या व्यतिरिक्त जिल्हा परिषदेच्या शेष फंडातून प्रत्येकी दहा हजार रुपये देण्याबाबत चर्चा झाली असून लवकरच तेही आर्थिक मदत वेगळी देण्यात येणार असल्याचे सीईओ स्वामी आणि सांगितले

जिल्ह्यातून आतापर्यंत ५३५ प्रकरणे जिल्हा परिषद प्रशासनाकडे प्राप्त झाली होती त्यापैकी शेतकऱ्यांना वीस लाखाचे आर्थिक मदत आतापर्यंत



देण्यात आले आहे तसेच उर्वरित शेतकऱ्यांच्या जनावरांचे पंचनामे करण्याचे काम सुरू आहे, त्याची माहिती आपण राज्य शासनाकडे तातडीने कळवली आहे, त्याकरिता आणखी एक कोटीची मागणी केली होती, त्यापैकी परवाच जिल्हा परिषद प्रशासनाला ९६ लाखांची आर्थिक मदत प्राप्त झाली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील उर्वरित शेतकरी या आर्थिक मदतीतून वंचित राहणार नाहीत अशी काळजी घेण्यात आली आहे.

जिल्ह्यातून आतापर्यंत ६२३ जनावरे या आजाराने दगावली असल्याची माहिती प्राप्त झाली आहे तर ५६५ जणांचे अहवाल तयार आहेत. जिल्ह्यात करमाळा, माळशिरस आणि माढा या ठिकाणी आजाराची मोठी साथ सुरू असून त्यादृष्टीने पशुसंवर्धन खात्यातील सर्व अधिकारी कर्मचारी ती आटोक्यात आणण्यासाठी अतोनात प्रयत्न करीत आहे. येत्या सोमवारपासून 'स्वच्छ गोठा'ही मोहीम हाती घेण्यात आल्या असून लवकरच ही परिस्थिती नियंत्रणाखाली आणण्यास मदत होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी घाबरून न जाता आलेल्या संकटाला दूर करण्यासाठी प्रयत्नशील राहा, ज्या शेतकऱ्यांकडे मोठ्या प्रमाणात जनावरे आहेत, अशा शेतकऱ्यांनी लंपी आजाराचे जनावर चांगल्या जनावरांपासून दूर ठेवावीत, असे असे आवाहन सीईओ स्वामी यांनी केले आहे.

> जिल्ह्यात आतापर्यंत मृत्यू पावलेल्या जनावरांची संख्या ६२३ इतकी आहे. आर्थिक मदत आतापर्यंत २० लाख ९१ हजारांचे वाटप झाले आहे. नुकताच जि. प. प्रशासनाला ९६ लाख ९१ हजारांचा निधी प्राप्त झाला आहे. सोमवारपासून जिल्ह्यात स्वच्छ गोठा मोहीम राबवण्यात येणार आहे. गाईला १५,००० रुपये तर बैल २०, ००० रुपये प्रत्येकी अशी आर्थिक मदत होणार आहे.



## माढा जि. प. प्रशालेच्या समस्या सोडवण्यासाठी प्राधान्य देणार : आ. शिंदे

✔ **सुराज्य/माढा** : सहकार महर्षी गणपतराव साठे जि. प. प्रशालेतील नवीन वर्गखोल्यांचे भूमीपूजन व ICT संगणक प्रयोगशाळेचे उद्घाटन माढा तालुक्याचे आमदार बबनराव शिंदे यांच्या हस्ते व नगराध्यक्षा ॲड. मिनल साठे यांच्या उपस्थितीत नुकतेच संपन्न झाले. यावेळी प्रशालेतील गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळेच खाजगी इंग्रजी शिक्षण संस्थेच्या आवाहनाच्या काळात १००० पर्यंत पट वाढला हे चांगल्या गुणवत्तेचे द्योतक असल्याचे गौरवोद्गार काढले. गुणवत्तेत अग्रेसर असणाऱ्या या प्रशालेच्या सर्व अडचणी सोडवण्यासाठी प्राधान्य देणार असल्याचे आश्वासन यावेळी आमदार बबनराव शिंदे यांनी दिले.

कार्यक्रमास यावेळी उपनगराध्यक्षा कल्पना जगदाळे, कुर्मदास साखर कारखान्याचे संचालक दादासाहेब साठे, माजी जि. प. सदस्य झुंजार नाना भांगे, व्यवस्थापन समिती अध्यक्ष धैर्यशील भांगे, सदस्य धनाजी कांबळे, माढा नगरपंचायतचे बांधकाम सभापती अरूण कदम, पाणीपुरवठा सभापती नितीन नाना साठे, जि. प. बांधकाम विभागाचे उपअभियंत हांडे, क. अभियंता रेपाळ, मुख्याध्यापक नागेश खेडकर, कॉन्टॅक्टर दिग्विजय कदम, पिंटू कदम, केंद्रप्रमुख सुरेश माळी, दत्ता काका अंबुरे, शहाजी नाना चवरे, चंद्रकांत कांबळे, मधुसूदन गायकवाड, सचिन चवरे, सोमनाथ चवरे, रणजित भांगेसह गावातील प्रमुख पदाधिकारी व पालकासह प्रशालेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती NMMS परीक्षेतून जिल्हा गुणवत्ता यादीत निवड झालेल्या प्रशालेतील १४ विद्यार्थ्यांचा आमदार बबनराव शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



## सिध्देश्वर शिक्षण मंडळाच्या अध्यक्षपदी ॲड. पाटील

✔ **सुराज्य/सोलापूर** : सिध्देश्वर शिक्षण मंडळाच्या अध्यक्षपदी ॲड. एस. आर. पाटील यांची निवड करण्यात आली. याप्रसंगी ज्येष्ठ विश्वस्त अड. रामदास फताटे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी विश्वस्त मंडळी उपस्थित होती. सिध्देश्वर शिक्षण मंडळाच्या अध्यक्षपदी ॲड. सिद्राम उर्फ एस. आर. पाटील सोलापूर - सोलापुरात शैक्षणिक क्षेत्रात गेल्या २८ वर्षापासून कॉलेज ऑफ आर्किटेक्चरच्या माध्यमातून कार्यरत असलेल्या सिध्देश्वर शिक्षण मंडळाच्या विश्वस्त मंडळाची सभ्ना दि. ९ नोव्हेंबर रोजी संपन्न होऊन अध्यक्षपदी ॲड. सिद्राम उर्फ एस. आर. पाटील यांची एकमताने निवड करण्यात आली. सदर बैठक संस्थेचे जेष्ठ विश्वस्त ॲड. रामदास फताटे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होऊन २०२२ ते २०२७ या पाच वर्षाकरिता संस्थेचे नूतन पदाधिकारी पुढीलप्रमाणे एकमताने निवडण्यात आत्रे.

उपाध्यक्ष-शरद नागांवकर, वैजिनाथ देवणीकर, खजिनदार-शंकर पाटील, सेक्रेटरी-डॉ. शशीकांत हलकुडे, सहसेक्रेटरी-असिम सिंदगी या सभेस संस्थेचे विश्वस्त मल्लेश कावळे, सीएबीएस बिराजदार, प्राचार्य गजानन धरणे, डॉ शिवरत्न शेटे व राजेंद्र मायनाळआदिनी शभेच्छा पर मनोगत व्यक्त करुन अभिनंदन केले. या संस्थेच्यावतीने उजनी नगर भागात आर्किटेक्चर कॉलेज, बटरफ्लाय इंग्लिश मीडियम स्कूल व विश्वकर्मा इन्स्टिटयूट ऑफ टेक्नोलॉजी इ. शैक्षणिक उपक्रम सुरु आहेत.



## मैंदर्गीचे वैभव कायमस्वरूपी राहणार : खा. डॉ. जयसिद्धेश्वर यांचा विश्वास

✔ सुराज्य/अक्कलकोट

**अक्कलकोट तालुक्यातील मैंदर्गी हे शहर धार्मिक तीर्थक्षेत्र असून या शहरातील तरुणांनी अध्यात्मिक धार्मिक प्रवचन कार्यक्रम ठेवून आदर्श कार्य केले आहे. या कार्यामुळे शहरात नवे चैतन्य दिसून येत आहे. या दहा दिवस चालणाऱ्या अध्यात्मिक प्रवचनामुळे समाजातील विविध भिन्न विचारसरणीला आळाघालून समाजाच्या उन्नतीसाठी फायदेशीर ठरणार आहे याबरोबरच समाजातील जागृतपणा तसेच सर्वत्र स्वच्छतेचे आणि भक्तिमय वातावरण हे आनंददायी ठरेल, अशा कार्यक्रमामुळे नव्या तरुणाईला प्रेरणा आहे. यामुळे मैंदर्गीचे वैभव कायमस्वरूपी राहणार असल्याचे प्रतिपादन सोलापूर जिल्ह्याचे खासदार डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामीजी यांनी केले.**

मैंदर्गी येथे श्री शिवचलेश्वर मंदिराच्या भव्य मैदानावर कोप्पळ येथील श्री अभिनव गवी सिद्धेश्वर महास्वामीजी यांच्या आध्यात्मिक प्रवचना उद्घाटन सोलापूर जिल्ह्याचे खासदार डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामीजी यांच्यासह शिवाचार्य आणि महास्वामीजींच्या प्रमुख दिव्य सानिध्यात ग्रामदैवत शिवचलेश्वर महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलनाने करण्यात आले. त्यावेळी खासदार डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामीजी बोलत होते.

यावेळी श्री नीलकंठ शिवाचार्य महास्वामीजी मैंदर्गी, श्री मळेंद्र शिवाचार्य अफजलपूर, शांतवीर शिवाचार्य मादन हिप्परगा, शिवयोगी शिवाचार्य अणदूर तसेच म. नि. प्र. महांतेश्वर महास्वामीजी मैंदर्गी, शांतलिंगेश्वर महास्वामीजी दुधनी, राजशेखर महास्वामीजी नंदगाव, अभिनव रेवणसिद्ध पट्टद देवरु मैंदर्गी, अभिनव शिवलिंगेश्वर महास्वामीजी, मादन हिप्परगा, बसवलिंग महास्वामीजी अक्कलकोट, महांत महास्वामीजी नरोणा, आदी शिवाचार्य व महास्वामी यांच्या प्रमुख उपस्थिती लक्षणीय होती.

मैंदर्गी शहरातून सकाळी सहा वाजता श्री अभिनव गवि सिद्धेश्वर महास्वामीजी यांचे सद्भावना पदयात्रा काढण्यात आले, या पदयात्रेत शहरातील विविध भजन मंडळ तसेच स्वयंसेवक उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. श्री अभिनव गवी सिद्धेश्वर स्वामीजी शहरातून पदयात्रा काढित असताना मार्गावर भक्तांनी आपापल्या घरासमोर आकर्षक रांगोळी काढून भक्तिमय वातावरणात स्वागत करण्यात आले होते.

या अध्यात्मिक प्रवचनात कर्नाटक व महाराष्ट्र सीमेवरील विविध गावातून वाहन करून मोठ्या प्रमाणात हजारो नागरिक महास्वामीजी यांचे प्रवचन ऐकण्यास मोठी गर्दी झाली होती. या गर्दीमध्ये महिलांची गर्दी ही आकर्षण ठरली होती.

> मैंदर्गीत प्रथमच आध्यात्मिक धार्मिक प्रवचन श्री शिवचलेश्वर मंदिराच्या भव्य दिव्य पटांगणात अतिशय सुंदर नियोजन करण्यात आले असून हजारो स्वंयस्फूर्ती स्वयंसेवक उपस्थित होते. हा प्रवचन दहा दिवस चालणार आहे.

## मोटारसायकलीला कट मारल्याच्या कारणावरून मारहाण

✔ सुराज्य/सोलापूर

'तू आमच्या मोटरसायकलला कट का मारला' असे विचारले असता फिर्यादी त्यांना काही न बोलता टोल नाक्यावरून पुढे आले असता दोन अनोळखी इसमाने मारहाण करून सोन्याची चैन,मोबाईल लंपास केल्याची घटना दि.९ नोव्हेंबर रोजी सिद्धेश्वर कारखाना समोरील टोलनाक्याजवळ घडली. अशी फिर्याद मल्लिनाथ खंडप्पा कोळी (वय-४६, रा. शिवशाही शंकर नगर, होटगी रोड, अंगणवाडी शेजारी, सोलापूर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. दोन अनोळखी इसमाविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादी हा त्याची स्कॉर्पिओ गाडी घेऊन शेताकडे गेला असता शेतातील काम संपवून घराकडे येत असताना सिद्धेश्वर कारखान्यासमोरील टोल नाक्याजवळ मोटर सायकलवरून पाठीमागे येऊन गाडी जवळ आले व 'तू आमच्या मोटरसायकलला कट का मारला?' असे विचारले असता त्यांना काही न बोलता पुढे गेले व टोल नाक्यावर आल्यास, दोन अनोळखी इसम हे परत टोलनाक्याजवळ येऊन मोटरसायकलवर उतरून फिर्यादीला हाताने मारहाण करण्यास सुरुवात केली. तेवढ्यात गाडीमधून एक अनोळखी इसम उतरला तो फिर्यादीला म्हणाला, तुमची गाडी माझ्या गाडीला खरचटली आहे माझा खर्च द्या, परंतु फिर्यादीस मारणारे दोन अनोळखी इसमाने याला आपण बुधवार पेठ इथे घेऊन जाऊ असे म्हणत होते तसेच त्यातील एक जण फिर्यादीस त्याच्या गाडीवर बसून चल, असे म्हणून लागला व दुसऱ्या फिर्यादीचे स्कॉर्पिओ गाडी घेऊन फिर्यादी त्या मोटरसायकलवर बसून निघाले.

फिर्यादी व अनोळखी इसम बालाजी सरोवर येथे आले असता तेथे फिर्यादीचे ओळखीचे गुंडप्पा जाधव, परशुराम असे दोघे आले. त्यांनी त्यावेळी फिर्यादी हा त्यांच्याबरोबर परत घरी जात असताना फिर्यादीने गळयातील चैन पाहिले, असता ती गळयात नव्हती ती टोल नाक्याजवळ भांड्याच्या वेळेस झटापटीने तुटली.

परंतु ती सोन्याची चैन, सॅमसंग कंपनीचा मोबाईल आरोपी त्यांनी घेऊन गेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास पोसई ए. एम. शेख हे करीत आहेत.

# डॉ. भास्कर पाटील यांचे कार्य कौतुकास्पद : कुलगुरू

## मधुमेह शिबिरात ३४५ जणांची तपासणी

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूरसारख्या ठिकाणी चांगले उपचार पध्दती आणून डॉ. भास्कर पाटील यांनी मधुमेह रुग्णांमध्ये आत्मविश्वासाचे वातावरण तयार करून मधुमेह नियंत्रणासाठी केलेले प्रयत्न कौतुकास्पद आहेत असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मृणालीनी फडणवीस यांनी केले. जागतिक मधुमहे दिनाच्या निमित्ताने डॉ. भास्कर पाटील डायबेटीस केअरच्यावतीने आयोजित मधुमेह तपासणी आणि मार्गदर्शन शिबीराचे आयोजन करण्यात आले होते त्यामध्ये त्या बोलत होत्या.



यावेळी सिध्देश्वर देवस्थानचे धर्मराज काडादी, सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. प्रिती टिपरे आदी मान्यंवर उपस्थित होते.

भारतात दर १० लोकांमागे ५ जणांना मधुमेह हा रोग जडत चालला आहे. लहान वयातच हा रोग सुरू होत असल्याने प्रत्येकाने जागृत होऊन या रोगाचा मुकाबला करण्यासाठी कुटुंबातील प्रत्येकाने दक्ष राहिले पाहिजे. लहानपणापासूनच या मधुमेहाबाबत जनजागृती झाली पाहिजे. डॉ. भास्कर पाटील यांनी अनेक मधुमेही रुग्णांना उपचार करून बरे केले आहेत. अत्याधुनिक उपचार पध्दतीने त्यांनी मधुमेहींवर उपचार करत आहेत त्यामुळे त्यांचे योगदान कौतुकास्पद आहेत, असेही कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी केले.

यानंतर डॉ. मनाली काणे यांनी आहाराविषयी मार्गदर्शन केले त्यानंतर योग आणि व्यायामावर धनंजय सुर्यवंशी यांनी मार्गदर्शन केले. या शिबीरामध्ये मधुमेही रुग्णामधील टाईप १ आणि टाईप २ प्रकारच्या रुग्णांची संपूर्ण तपासणी करण्यात आली.या शिबीरात दिवसभरात जवळपास ३४५ रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली शेवटी डॉ. दिप्ती गोरे यांनी आभार व्यक्त करून शिबीराची सांगता करण्यात आली.

## बापूंना लोळवण्यासाठी ठाकरेंचा 'पठ्ठा' मैदानात

✔ **सुराज्य/सोलापूर** : सांगोल्याचे शिंदे गटाचे आमदार शहाजीबापू पाटील यांनी उध्दव ठाकरे यांच्या विरोधात केलेले बंड आणि 'काय झाडी'मुळे त्यांना मिळत असलेली प्रसिध्दी 'मातोश्री'च्या जिव्हारी लागली असून बापूंना राजकीयदृष्ट्या नामोहरम करण्याची रणनीती ठाकरे यांच्या शिवसेनेकडून आखण्यात आली आहे. बापू यांचे कट्टर विरोधक असलेले तथा ओबीसी चळवळीतील नेते लक्ष्मण हाके यांना ठाकरे यांच्याकडून मोठे पाठबळ देण्यात येत आहे. हाके यांच्यावर पक्षाची भूमिका मांडण्याची अर्थात प्रवक्तेपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. हाकेंना हा मिळालेला मान म्हणजे आगामी निवडणुकित बापूंच्या विरोधात हाके यांना मैदानात उतरवण्याची तयारी झाली असल्याचे मानले जात आहे.

विधानसभेच्या २०१९ च्या निवडणुकित शहाजीबापू हे शिवसेनेच्या तिकिटावर निवडून आले. मात्र, एकनाथ शिंदे यांनी केलेल्या बंडात सहभागी होत त्यांनी ठाकरेंच्या विरोधात उघड



भूमिका घेतली. इतकेच काय? तर त्यांनी ठाकरे यांच्या विरोधात अनेकदा कडवट शब्दांत टीका केली आहे. आदित्य ठाकरेंवरही त्यांनी शेलक्या शब्दांत निशाणा साधला होता. त्यावर आदित्य ठाकरेंनी 'आम्ही गद्दारांना किंमत देत नाही' असे सांगून बापूंना अनुल्लेखाने मारले होते. मात्र, त्याच वेळी सांगोल्यातच बापूंना घेरण्याची रणनीती आखण्यात येत होती.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने शिवसेनेकडून ही तयारी करण्यात येत असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीच्या वेळी लक्ष्मण हाके हे सांगोल्याचे शिवसेनेचे उमेदवार होऊ शकतात, या दृष्टीने शिवसेनेची पावले पडत आहेत. ठाकरेंची ही रणनीती यशस्वी होते का हे पाहण्यासाठी विधानसभा निवडणुकीपर्यंत वाट पाहावी लागणार आहे.

## निधन वृत्त

### शिवगंगाबाई बिराजदार



✔ **सुराज्य/सोलापूर** :शेगांव (ता.अक्कलकोट) येथील रहिवासी शिवगंगाबाई नागणा बिराजदार ( वय ६८ वर्ष ) यांचे शनिवारी दि.१२ नोव्हेंबर रोजी रात्री सव्वा दहा वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, एक मुलगी, नातवंडे असा परिवार आहे. त्या शेगावचे उपसरपंच शरणप्पा बिराजदार यांच्या मातोश्री होत्या.

### कमळाबाई भांबुरे



✔ **सुराज्य/सोलापूर** : आकाशवाणी सोलापूर केंद्रातील वरिष्ठ अभियंता प्रकाश भांबुरे यांच्या मातोश्री श्रीमती कमळाबाई दत्तात्रेय भांबुरे(रा. साईधन नगर,आरटीओच्या मागे-विजापूर रोड) यांचे (वय-८५)रविवारी दुपारी निधन झाले.रात्री त्यांच्यावर अत्यंसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात दोन मुले,तीन मुली,सुना,नातवंडे असा परिवार आहे

# लाल झेंडा फडकवून शहिदांना लाल सलामी

## प्रलोभने आणि आश्वासनाने कामगारांना देशोधडीला लावणाऱ्या नरेंद्र मोदींचा धोका ओळखा : कॉ. के. आर. रघु

✔ सुराज्य/सोलापूर

वाढती महागाई आटोक्यात आणू, पेट्रोल डिझेल व घरगुती इंधन दर कमी करू, काळा पैसा आणू, बेरोजगार युवकांना दरवर्षी दोन कोटी नोकऱ्या देऊ, देशाला आत्मनिर्भर करू अशी पोकळ घोषणा, खोटी आश्वासने आणि फसवी प्रलोभने देऊन देशवासियांचा घात मोदी सरकारने केलेला आहे. त्यामुळे श्रमिक कामगार देशोधडीला लागले, अशी टीका करत हा नरेंद्र मोदींचा वाढता



धोका ओळखा, असा इशारा सेंटर ऑफ इंडियन ट्रेंड युनियन्स चे राज्य कोषाध्यक्ष के. आर. रघु यांनी अधिवेशनच्या उद्घाटनपर भाषण करताना दिला.

सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन्स सोलापूरचे १६वे राज्य अधिवेशन रविवार दि. १३ नोव्हेंबर रोजी शिवछत्रपती रंगभवन येथे पार पडले.

या अधिवेशनाची सुरुवात प्रजा नाट्य मंडळ कलापथकांच्या क्रांतिकारी गीताने झाली. ज्येष्ठ नेते माजी आमदार कॉ. नरसय्या आडम मास्तर यांच्या हस्ते ध्वजारोहण करून वर्गीय चळवळीतील शहीद हुतात्म्यांना पुष्पांजली अर्पण करण्यात आले. स्वागत युसुफ शेख मेजर यांनी केले.

सिटूच्या नेत्या माजी नगरसेविका कॉ. नलिनी कलबुर्गी यांनी मांडले. तद्नंतर सत्कार समारंभ पार पडला.

यावेळी प्रा. अब्राहम कुमार, कुरमय्या म्हैत्रे, नगरसेविका कामिनी आडम, नसीमा शेख, सुनंदा बल्ला, शकुंतला पाणीभाते, मुरलीधर सुंचू, दीपक निकंबे, डी. रमेश बाबू, विल्यम ससाणे, डी. वाय. एफ. आय. चे जिल्हा अध्यक्ष विक्रम कलबुर्गी, अशोक बल्ला, अकील शेख, बापू साबळे, बजरंग गायकवाड, बाळकृष्ण मल्याळ, मोहन कोक्कुल, सनी शेट्टी, गीता वासम, सावित्री गुंडला, शरिफा शेख, शहनाज शेख, तौफिक शेख, आरिफ मणियार, शहाबुद्दीन शेख, इलियास सिद्दीकी, ॲड. नसीर मशाळवले, बाबू कोकणे, नरेश दुगाने, अकिल शेख आदी पदाधिकारी व समिती सदस्य उपस्थित होते. सूत्रसंचालन ॲड. अनिल वासम यांनी केले.

# मनाला शांती देणारा विचार, ज्ञानोबा तुकारामांनंतर गोंदवलेकर महाराजांनी दिला : नाईक-निंबाळकर



## चंडक प्रशालेची विद्यार्थिनी शिंपले हिची राष्ट्रीय मैदानी स्पर्धेसाठी निवड

सुराज्य/सोलापूर : ज. रा. चंडक प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाची विद्यार्थिनी कुमारी अश्विनी शिंपले हिचा दिनांक ११ ते १५ नोव्हेंबर २०२२ या दरम्यान आसाम (गुहावटी) येथे होणाऱ्या ज्युनियर राष्ट्रीय मैदानी स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल संस्थेतर्फे अध्यक्षा निर्मला ठोकळ यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते विनय ढेपे, विक्की देशमाने व राजाभाऊ आलूरे यांनी या राष्ट्रीय खेळाडूला मदत म्हणून रुपये- २१००० चा धनादेश व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. या प्रसंगी प्रशालेचे मुख्याध्यापक उदय जाधव , पर्यवेक्षक सतिश सुभेदार, क्रीडाशिक्षक दशरथ गुरव, सामाजिक कार्यकर्ते आनंद भवर, सोनटक्के, सुरवसे, प्रशालेचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विदयार्थ्यांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.

## दुचाकींच्या धडकेत एकजण जखमी

सुराज्य/सोलापूर : दुचाकिवरून जात असताना पाठीमागून येणाऱ्या एका दुचाकिने एकास धडक देऊन जखमी होण्यास कारणीभूत ठरल्याप्रकरणी दुचाकि चालकाविरुध्द जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. हि घटना दि. १२ नोव्हेंबर रोजी दुपारी साडेचार वाजण्याच्या सुमारास सम्राट चौक मार्गे मार्केट यार्डकडे जाणाऱ्या रस्त्यावर घडली. याप्रकरणी अमर प्रल्हाद कांचन (वय-४३, रा. मोहिते नगर, होटगी रोड, सोलापूर) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून दुचाकि क्रमांक एम. एच. १३. डीयु. ६४७८ या अज्ञात दुचाकि चालकाविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी हे त्यांच्या दुचाकिवरून वरील ठिकाण्याहून जात असताना हनुमान नगर रोड येथे पाठीमागून आलेल्या वरील दुचाकि क्रमांकाच्या चालकाने अतिवेगाने वाहन चालून जोरात धडक दिली. या धडकेत फिर्यादी अमर यांच्या हातास व त्यांच्या पायाला दुखापत होऊन फॅक्चर होण्यास कारणीभूत ठरला आहे. घटनेचा पुढील तपास पोह. शेख हे करीत आहेत.

## शेताच्या वादावरून मारहाण; सात जणांवर गुन्हा

सुराज्य/सोलापूर : शेताच्या वादावरून शिवीगाळ करून मारहाण केल्याप्रकरणी सात जणांविरुध्द एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दि. १० नोव्हेंबर रोजी सायंकाळी पाच ते सात वाजण्याच्या दरम्यान तपोवरत्न वाणी केंद्राच्या पाठीमागे आकाशवाणी रोड



येथे घडली. याप्रकरणी उत्तम शरणबसप्पा पाटील (वय-५९, रा. तपोरत्नवाणी आकाशवाणी रोड) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून मल्लिनाथ कोळी, अनिता कोळी, चन्नप्पा कोळी, गौरीशंकर कोळी, वनिता कोळी, सचिन माने व मल्लिनाथ यांची बहीण अंबव्वा माने (सर्व. रा. शंकर नगर होटगी गाव) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी व फिर्यादी यांची पत्नी, काकू असे सर्वजण गुरुकृपा सुपर मार्केट मध्ये बोलत बसले होते. त्यावेळी वरील संशयित आरोपी यांनी फिर्यादी यांच्या गुरुकृपा सुपर मार्केट येथे येऊन मल्लिनाथ कोळी याने शेताचा कोर्टामधील वाद कधी मिटवून घेतोस असे म्हणाला. त्यावेळी फिर्यादी यांनी मी मिटवून घेणार नाही कोर्ट जो निकाल देईल तो निकाल मान्य असेल असे म्हणाले असता, त्यावेळी मल्लिनाथ कोळी याने रागाला जाऊन शिवीगाळ करत हाताने लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. या मारहाणीत फिर्यादी यांचे मुले महादेव व रमेश यांना देखील मारहाण करून फिर्यादी यांच्या मुलाच्या गळ्यातील पाच तोळ्याची सोन्याची चैन चन्नप्पा कोळी याने ओढून घेऊन गाडीच्या टाकीवर दगड मारून पाच हजार रुपयांचे नुकसान केले आहे. असे फिर्यादीत म्हटले आहे.

## खंडाळी येथे कुऱ्हाड आणि गजाने मारहाण; वृद्धेसह दोघे जखमी

सुराज्य/मोहोळ : भावकितील शेतात असलेल्या विहिरीतील पाण्याच्या कारणावरून कुऱ्हाड आणि लोखंडी गजाने केलेल्या मारहाणीत आई आणि मुलगा असे दोघे जखमी झाले. ही घटना खंडाळी (ता. मोहोळ) येथे रविवारी सकाळच्या सुमारास घडली. रणजीत धर्मा श्रीखंडे (वय ३८) आणि त्यांची आई शांताबाई श्रीखंडे (वय ६१ रा. खंडाळी) अशी जखमींची नावे आहेत. त्यांना मोहोळ येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांना पांडुरंग श्रीखंडे आणि अन्य ५ जणांनी मिळून मारहाण केली. अशी प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

---

सुराज्य/नातेपुते

राजकारणात सत्ता येते जाते सरकार येते जाते परंतु समतोल गेलेला समाज सत्तेच्या पुढे सत्ता टिकवू शकत नाही समतोल ठेवण्याचे काम अशा धार्मिक स्वरूपाच्या कार्यक्रमातून होत असते. समाजाचे मानसिक सतूलंन बिघडत चालले असून अशावेळेस सामाजिक समतोल राखण्यासाठी मनाला शांती देणारा विचार, ज्ञानोबा तूकारामांनंतर गोंदवलेकर महाराजांनी दिला असल्याचे मत विधानपरिषदेचे सभापती रामराजे नाईक निंबाळकर यांनी व्यक्त केले.

ते लोंढेवस्ती कांरुडे ता. माळशिरस येथील चैतन्य जप प्रकल्पाच्या २२ व्या राज्यस्तरीय शिबीराप्रसंगी बोलत होते. पुढे बोलताना रामराजे म्हणाले, पवार साहेब कोणी असले तरी ते साहेब आहेत तसे विजयसिंह मोहिते-पाटील दादा कोठेही असले कोणत्याही पक्षात असले तरी विजयदादा हे आमच्या दृष्टीने विजयदादाच आहेत त्यांना भेटायला मिळते हा योगही गोंदवलेकर महाराज यांनीच आणला आहे. प्रास्ताविकात शिबिर प्रमूख धैर्यशील



देशमूख म्हणाले कि, कारूंडे सारख्या ग्रामीण भागात भव्य दिव्य जप प्रकल्पाचे शिबिर होत असुन यांचे संपुर्ण श्रेय येथील युवकांचे आहे, समाज, राजकारण, अध्दात्म या क्षेत्रात नितिमत्ता ढासळू लागली असुन यास रामनाम जपाशिवाय पर्याय नाही कसे वागले पाहिजे, जीवन कसे जगले पाहिजे हे नीतिमत्तेचे धडे हे सद्गुरु ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांनी दिले. हे धडे देण्याचे काम या जप प्रकल्पामधून चालले आहे असे मत मत धैर्यशील देशमूख यांनी प्रस्ताविका मधून व्यक्त केले.

जप प्रकल्पाच्या शिबिराचे उद्घाटन भाग्यवान जपकार सुशीला पवार, महादेव पवार माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, विधान परिषदेचे सभापती रामराजे निंबाळकर, शंकर वेदाचार्य शिवानंदजी भारती महाराज, अध्यात्मिक गुरु राजन देशमुख, ह. भ. प. नवनाथ महाराज, सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष बाबाराजे देशमुख यांच्या शुभहस्ते प्रतिमापूजन दीप प्रज्वलन व महाराजांची आरती घेऊन उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन औदुंबर बुधावले यांनी केले असून आभार राजेंद्र मोरे यांनी मानले यावेळी मीनादेवी देशमुख, नातेपुते नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष मालोजीराजे देशमुख, अमरशील देशमुख, साहेबराव देशमुख, नाथाजीराव देशमुख, अकलूज कृषी उत्पन्नन बाजार समितीचे उपसभापती जननायक मामासाहेब पांढरे, फलटण दूध संघाचे चेअरमन धनंजय पवार, हनुमंत पाटील बापूराव लोंढे युवराज साळुंखे राजेंद्र मोरे सतीश बर्गे, सतीश बडवे तसेच अनेक मान्यवर व भाविक भक्त मोठया संख्येने कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

महाराजांच्या पादुकाचे व प्रतिमेचे हत्तीवरून वाजत गाजत नामस्मरणाच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली. शिबिरात कार्यवाहक समिती नेमण्यात आल्या आहेत. अखंड जपमाळ वेळेचे नियोजन करण्यात आले आहे. येणाऱ्या भाविकांसाठी निवास व्यवस्था व भोजन व्यवस्था करण्यात आली आहे. अनेक स्वयंसेवक नेमण्यात आले आहेत. पार्किंग व्यवस्था करण्यात आली आहे.

---

## एकरी १०० टनाहून अधिक ऊस उत्पादन शक्य : माने

सुराज्य/बार्शी

ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी शास्त्रशुध्द पध्दतीने आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर करत शेती केल्यास एकरी १०० टनाहुन अधिक ऊस उत्पादन सहज शक्य आहे असे मत सांगली तालुक्यातील आष्टा येथील ऊस बागायतदार शेतकरी संशोधक संजीव माने यांनी व्यक्त केले. येथील उच्चतम कृषि उत्पन्न बाजार समितीने अमृत महोत्सवी वाटचालीनिमित्त आयोजित केलेल्या ५ दिवसीय भव्य राज्यस्तरीय भगवंत कृषि महोत्सवातील पाचव्या दिवशी एकरी १०० टनाहुन अधिक ऊस उत्पादन सहज शक्य या विषयावरील परिसंवादात ते बोलत होते.

यावेळी बाजार समितीचे सचिव तुकाराम जगदाळे, प्रगतशील बागायतदार युवराज पाटील, कृषिकन्या महिला शेतकरी वेधमती भोसले, अनिल पाटील आदी व्यासपिठावर उपस्थित होते. यावेळी माने म्हणाले ऊस हे शेतकऱ्यांसाठी किफायतशीर बागायत पिक आहे. ऊसाला चांगला उतारा मिळावा यासाठी सर्वजण प्रयत्न करतात. मात्र तो का मिळत नाही याच्या कारणांचा अभ्यास केला जात नाही. जगभरात एकरी १००-१५० पेक्षा अधिक टन ऊस उत्पादन होते. आपल्या देशातही याबाबत प्रयोग सुरू आहेत. मी स्वत: विविध प्रयोग करून एकरी १६८ टन ऊस इतके उत्पादन मिळवले आहेत. त्यामुळे अमेरीकेचे राष्ट्रअध्यक्ष बराक ओबामा यांनी मला आंतरराष्ट्रीय शेतकरी परिषदेसाठी तज्ञ म्हणुन आमंत्रित केले होते. मी सध्या एकरी १२५ टन ऊस उत्पादन सरासरी घेतो आहे. ऊस उत्पादन वाढण्यासाठी पाच महत्वाच्या बाबींचा प्रामुख्याने विचार केला पाहिजे. चांगली जमीन, सुपीक जमीन असणे व जर ती नसेल तर ती तशी सुपीक बनवणे गरजेचे आहे. ऊस लागवडीची योग्य पध्दत वापरलीच पाहिजे. रासायनिक खतांच्या मात्रांचा प्रमाणबध्द वापर केला पाहिजे. ऊसाला थोडं थोडं पाणी सारखं सारखं लागतं हे लक्षात ठेवले पाहिजे. खोंड, किडी सारख्या रोगापासून ऊस पिकांचा सरंक्षण केलं पाहिजे. ऊसाच्या लागवडी करताना ४० ते ४५ हजार डोळे पेरले जातात. प्रत्येक डोळ्याला सरासरी ५ ते ६ फुटवे लागतात मात्र त्यापैकी म्हणजे अडीच लाख फुटव्यांपैकी केवळ ४० हजार फुटवे जगतात. ऊस तोडणीला येतो तेव्हा केवळ ४० ते ४५ हजार पक्व ऊस असतो. उर्वरित मृत झालेले २ लाख फुटवे इतर फुटव्यांचे अन्नद्रव्य शोषतात हे लक्षात घेतले पाहिजे. ऊस शेतीला शेणखताशिवाय पर्याय नाही. शेणखत हे सर्वोत्तमच आहे. मात्र ते नसेल तर किंवा कमी असेल तर कंपोस्ट खत, हिरवळीचे खत, गांडुळ खत किंवा शेतामध्ये बकऱ्यांच्या लेंडीचे खत यांचाही वापर केला पाहिजे. तसेच मॅग्नेशिअम सल्फेट, युरीया व इतर खतांचा प्रमाणबध्द वापर केला पाहिजे. ऊसाला पाण्याबरोबरच सुर्यप्रकाशाचीही गरज असते हे लक्षात घेतले पाहिजे. ऊस उत्पादनाबाबत जागरूक राहिल्यास व सातत्याने ऊस शेतीबाबत होणाऱ्या नव्या संशोधनातील बदल अंगीकारल्यास चांगले ऊस उत्पादन होवु शकते.

सोलापूर जिल्ह्यात अतिशय उष्ण तापमानाचाही ऊस उत्पादनावर विपरीत परिणाम होत असल्याचे माने यांनी यावेळी नमुद केले. बार्शी तालुक्यात ऊस उत्पादक शेतकऱ्यांची मोठी संख्या लक्षात घेवुन उपयुक्त विषयावर व्याख्यान आयोजित केल्यामुळे या कार्यक्रमास ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मंगेश दहिहांडे व अपर्णा दळवी यांनी केले.

## काळमवाडी ग्रामपंचायत निवडणुकीची रणधुमाळी

सुराज्य/पिलीव : माळशिरस तालुक्यातील काळमवाडी ग्रामपंचायतीच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. यासाठी गावातील नेतेमंडळी कामाला लागली असुन बैठकांचा जोर वाढला आहे. गत पंचवार्षिक निवडणुकीत मोहीते पाटील पॅनलने बाजी मारली होती यामध्ये त्यावेळेस थेट जनतेतुन सरपंचाची निवड झाली होती. यामध्ये त्यावेळेस सरपंच पद मागासवर्गीय पुरुष एससी साठी आरक्षीत होते त्या निवडणुकीत सरपंच १६० मतांनी निवडून आले होते तसेच सहा सदस्य निवडून आले होते तर विरोधी गटाचे तिन सदस्य निवडून आले होते. यंदा सरपंच पद ओबीसी साठी आरक्षीत आहे.



तिन प्रभाग आहेत प्रभाग एकचे मतदान ४०९ असुन यामध्ये एक ओपन, एक ओपन महीला, एक ओबीसी महीला असे आरक्षण आहे, प्रभाग दोन एकुण मतदान ४८८ आहे यामध्ये दोन सर्वसाधारण महीला, एक पुरूष असे आरक्षण आहे, तर प्रभाग तिन मध्ये एकुण मतदान ४५५ आहे तर एक ओबीसी, एक सर्वसाधारण पुरूष व एक महीला असे आरक्षण आहे. सत्ताधारी मोहीते पाटील पॅनल व विरोधी गटाकडुन सध्या निवडणुकीची जोरदार तयारी सुरू आहे. सत्ताधारी मोहीते पाटील गट आपली सत्ता अबाधीत राखण्यासाठी प्रयत्न करीत आहे तर विरोधी गट ग्राम पंचायत ताब्यात घेण्यासाठी जोरदार प्रयत्न करीत आहे.

---



## राष्ट्रीय लोकअदालतीत १६१ प्रकरणे निकाली

### लोकअदालतीत २ कोटी ६० लाख ९६ रुपयांची तडजोड

सुराज्य/पंढरपूर

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार पंढरपूर तालुका विधी सेवा समितीच्या वतीने शनिवार दि. १२ नोव्हेंबर २०२२ रोजी जिल्हा न्यायालय, पंढरपूर येथे लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. या लोकअदालतीमध्ये १६१ प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यात आली.

या प्रकरणांमध्ये २ कोटी ६० लाख ९६ हजार ७५८ तडजोड करण्यात आली असल्याची माहिती जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष एम. बी. लंबे यांनी दिली. राष्ट्रीय लोकअदालतीसाठी एकुण ५ पॅनलची व्यवस्था करण्यात आली होती. यामध्ये १६१ प्रलंबित प्रकरणे व दाखल पूर्व प्रकरणे निकाली काढण्यात आली. या पॅनलमध्ये जिल्हा न्यायाधीश एम. बी. लंबे, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ एम. आर. जाधव, दिवाणी न्यायाधीश एस. ए. साळुंखे, दिवाणी न्यायाधीश श्रीमती आर. जी. कुंभार, सह दिवाणी न्यायाधीश एस. एच. इनामदार, यांनी काम पाहिले.

तत्पूर्वी लोकअदातीचे उद्घाटन जिल्हा न्यायाधीश एम. बी लंबे यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच लोक अदालतींबाबतची महत्वाची माहिती सांगण्यात आली. यावेळी पंढरपूर अधिवक्ता संघाचे अध्यक्ष भगवान मुळे,. विधी स्वयंसेवक सुनिल यारगट्टीकर हे उपस्थित होते. या लोकअदालतीस विधीज्ञ, बँक कर्मचारी, न्यायालयीन कर्मचारी, महावितरणचे अधिकारी व पक्षकार मोठया संख्येने उपस्थित होते.

## राष्ट्रीय धनुर्विद्या स्पर्धेत समृध्दीला पाच सुवर्णपदके



सुराज्य/मोडनिंब : पणजी गोवा या ठिकाणी झालेल्या ४१ व्या ज्युनियर राष्ट्रीय धनुर्विद्या चॅम्पियन स्पर्धेत अरण ता. माढा येथील संत सावतामाळी विद्यालय अरणची विद्यार्थिनी समृध्दी शिवप्रसाद पवार हिने इंडियन राउंड प्रकारात खेळताना नवीन विक्रमाची नोंद करत पाच सुवर्णपदके पटकावले.

०३ ते ११ नोव्हेंबर या कालावधीत पणजी गोवा येथील कॅम्पल स्पोर्ट ग्राउंड वर ज्यूनियर आर्चरी च्या राष्ट्रीय स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेत २५ राज्यातील प्रत्येकी चार पुरुष व चार महिला स्पर्धकांनी सहभाग घेतला. या स्पर्धेत महाराष्ट्रातून अरण येतील संत सावतामाळी विद्यालयाची व एकलव्य अॅकॅडमी मोडनिंब ची विद्यार्थिनी समृध्दी ने ४० मीटर अंतरावरून ३६० पैकी ३२७ गुण, ३० मीटर अंतरावरून ३६० पैकी ३३३ गुण घेऊन दोन सुवर्णपदके घेतली. याशिवाय महाराष्ट्र संघाचे सांघिक नेतृत्व करताना तिने वैष्णवी पाटील, साक्षी ताटे, साक्षी एडके यांच्या साथीने उत्तराखंड, छत्तीसगड, हरियाणा व झारखंड या राज्यांचा पराभव करीत सुवर्णपदक पटकावले. याशिवाय मिश्र दुहेरीत अनिकेत गावडेसोबत महाराष्ट्राचे नेतृत्व करत दिल्ली, गुजरात, उत्तर प्रदेश, हरियाणा या राज्यांचा पराभव करत सुवर्णपदक पटकावले. तसेच वैयक्तिक प्रकारात खेळताना समृध्दीने ओरिसा, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, झारखंड, गुजरात व अंतिम महाराष्ट्र या संघाच्या खेळाडूंना हरवत सुवर्णपदक पटकावले.

समृध्दीला एकलव्य अॅकॅडमीचे प्रशिक्षक विठ्ठल भालेराव यांचे मार्गदर्शन लाभले. ती सध्या संत सावतामाळी विद्यालय अरण या ठिकाणी दहावीत शिक्षण घेत आहे. तिच्या या दैदीप्यमान यशाबद्दल भारतीय धनुर्विद्या संघाचे सचिव प्रमोद चांदूरकर आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक अभिजीत दळवी सर धनुर्विद्या संघटनेचे अध्यक्ष माननीय धैर्यशील मोहिते-पाटील, उपाध्यक्ष तथा जिल्हा परिषद सदस्य भारत आबा शिंदे, समाज कल्याणचे माजी सभापती शिवाजी राजे कांबळे, माढेश्वरी बँकेचे संचालक विजय शिंदे, धनुर्विद्या राज्य संघटनेचे उपाध्यक्ष तथा संत सावतामाळी विद्यालयाचे प्राचार्य हरिदास रणदिवे आदींनी तिचे विशेष अभिनंदन केले.

---

# प्रताप मंडळातर्फे बालक्रीडा स्पर्धा उत्साहात

सुराज्य/अकलूज

कला, क्रीडा, सांस्कृतीक, समाजीक क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्या शंकरनगर-अकलूज येथील प्रताप क्रीडा मंडळाच्या वतीने आज रविवार दि. १३ रोजी आयोजित केलेल्या बालक्रीडा स्पर्धेचे उद्घाटन जिजामाता कन्या प्रशालेच्या सभापती सुलक्षणादेवी जयसिंह मोहिते-पाटील यांचे शुभहस्ते मोठ्या दिमाखात संपन्न झाले. सदरच्या स्पर्धा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडल्या.

विजयसिंह मोहिते-पाटील क्रीडा संकुल येथे सदर स्पर्धेसाठी प्रताप क्रीडा मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील, विद्यमान अध्यक्षा स्वरूपाराणी जयसिंह मोहिते-पाटील, दिपकराव खराडे-पाटील, शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव हर्षवर्धन खराडे-पाटील, सुमित्रा पतसंस्थेचे चेअरमन महादेव अंधारे, खजिनदार वसंत




जाधव, सचिव पोपट भोसले-पाटील, शिक्षण प्रसारक मंडळाचे सदस्य उत्कर्ष शेटे, प्रताप क्रीडा मंडळाचे सदस्य यशवंत माने-देशमुख, बिभीषण जाधव, राजेंद्र देवकर नंदकुमार गायकवाड, भानुदास आसबे, फिरोज तांबोळी, सुहास थोरात, विविध शाखेचे मुख्याध्यापक, क्रीडा शिक्षक-शिक्षिका उपस्थित होते.

प्रारंभी प्रताप क्रीडा मंडळाच्या स्पर्धेचे उद्घाटन सुलक्षणादेवी जयसिंह मोहिते-पाटील यांचेहस्ते ध्वजारोहण करून झाले. तर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते कै. सहकार महर्षी शंकरराव नारायणराव मोहिते-पाटील व श्रीमती स्व. रत्नप्रभादेवी शंकरराव मोहिते-पाटील यांचे प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी महर्षी गीत ही सादर झाले. स्पर्धेच्या मैदानाचे पूजन जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील व सुलक्षणादेवी जयसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते झाले व स्पर्धेला प्रारंभ झाला. सुलक्षणादेवी जयसिंह मोहिते-पाटील यांनी सहभागी सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या व उद्घाटन झाल्याचे जाहीर केले. प्रस्ताविक स्पर्धा प्रमुख शिवाजी पारसे यांनी केले आहे. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण संपन्न झाले. सूत्रसंचलन किरण सूर्यवंशी व आर. आर. पाटील यांनी केले. प्रताप क्रीडा मंडळाच्या अध्यक्षा मा. कु. स्वरूपाराणी जयसिंह मोहिते-पाटील यांचे शुभहस्ते ध्वजावतरण करून स्पर्धेचा समारोप झाला.

### स्पर्धेतील गटनुसार प्रथम तीन विजेते पुढीलप्रमाणे

**लहान गट – (मुली) –** डोक्यावर चेंडू घेऊन पळणे या गटात प्रथम - प्रार्थना चव्हाण, द्वितीय - आरोही पवार, तृतीय - विनया मगर, (मुले) - प्रथम - हसनैन शेख, द्वितीय - हर्षद गुरळकर, तृतीय - अभिश्रेय मदने

**मोठा गट – (मुली)** ५० मीटर धावणे या गटात प्रथम - दुर्गा केमकर, द्वितीय - योगी घोडके, तृतीय - राजनंदिनी जाधव, (मुले) - प्रथम - निरंजन पवार, द्वितीय - तेज लावंड, तृतीय - श्रीराज महादार

**इयत्ता १ ली** कमरेवर हात ठेऊन उड्या मारत जाणे (मुली) प्रथम - तमन्ना खान, द्वितीय - जुनेद मुलाणी, तृतीय - आन्वेशा बनकर, (मुले) - प्रथम - आर्यन गमे, द्वितीय - मानव काटकर, तृतीय - श्लोक सरगर, इयत्ता २ री लंगडी घालत जाणे (मुली) - प्रथम - श्रेया मदने, द्वितीय - स्वरा वाळेकर, तृतीय संस्कृती पोळ, (मुले) - प्रथम - सार्थक शिंदे, द्वितीय - शिवेंद्र भोसले, तृतीय - पृथ्वीराज कांबळे

**इयत्ता ३ री –** तीन पायाची शर्यत (मुली) सर्व क्रमांक विभागूण प्रथम राजनंदिनी दुपडे, अंकिता काळे, द्वितीय - साई थिटे, धनश्री मंडलीक, तृतीय श्रेया इंगळे, माही साठे. (मुले) - सर्व क्रमांक विभागूण प्रथम - विहान मगर, तेजस गायकवाड, द्वितीय - शिवराज मगर, श्रेयस मगर, तृतीय - आदित्य भोसले, श्लोक खंडागळे.

**इयत्ता ४ थी –** पोत्यात पाय घालून उड्या मारत जाणे (मुली) - प्रथम - श्वेता कोडम, द्वितीय - सायली गायकवाड, तृतीय - अनुष्का शिंदे, (मुले) - प्रथम - मुजफ्फर गालीब, द्वितीय - सौरभ चव्हाण, तृतीय - प्रज्वल फलटणकर, यांचेसह अनेक उत्तेजनार्थ बक्षीसेही स्पर्धकांनी पटकावली.

# निविदा स्तरावरील कामे रद्द केल्यास माहिती द्यावी

## मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे आदेश

सुराज्य/औरंगाबाद

**महाविकास आघाडी सरकारच्या काळात मंजूर केलेली पण निविदा स्तरावर असलेली कामे रद्द केली असतील तर त्याची माहिती खंडपीठाला द्यावी, असे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्या. रवींद्र घुगे व न्या. संजय देशमुख यांनी दिले आहेत. राज्य शासन बदलल्यामुळे धोरणात्मक निर्णय बदलण्यात येऊ नये, असे राज्य घटनेच्या २०२ व्या कलमात नमूद असल्याने त्याआधारे शिंदे-फडणवीस सरकारने रद्द केलेल्या कामांच्या निर्णयाला याचिकेद्वारे आव्हान देण्यात आले आहे. खंडपीठाने यापूर्वी प्रतिवादींना नोटीस बजावली आहे. तर कार्यारंभ देण्यात आलेल्या विकासकामांना प्रशासनाच्या स्तरावर कुठलीही अडचण नसल्याचे राज्य शासनाच्यावतीने स्पष्ट करण्यात आले आहे.**

राज्यात महाविकास आघाडी सरकार सत्तेवर असताना त्यांनी विविध जिल्ह्यांमध्ये तसेच तालुक्यातील शासनाच्या विभागांना निधींची घोषणा केली होती. अंबड, घनसावंगी, जालना तालुक्यांसह हिंगोली जिल्ह्यातही अशा प्रकारे विविध विकास कामांच्या निधीला मंजुरी प्रदान करण्यात आली होती. हिंगोली जिल्ह्याचा सिंचनाचा अनुशेष मोठा असल्यामुळे मविआने त्यासाठी विविध विभागांना विकासाच्या योजनांना मंजुरी दिली होती. वसमत नगर परिषदेला पाच कोटी मंजूर करून निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कार्यारंभादेश दिले होते. २८ जून २०२२ रोजी न. प. च्या खात्यात चार कोटी जमा करण्यात आले होते. ग्रामविकास विभागाला ९ कोटी मंजूर केले होते आणि ३ मार्च २०२२ च्या पत्रानुसार २ कोटी ७८ लाख रुपये जमा झाले होते. मृद व



जलसंधारण विभागाच्या वतीने १९ कोल्हापुरी बंधारे बांधण्यासाठी २५ कोटी ५३ लाख दिले होते. मुख्य सचिवांनी २१ जुलै २०२२ रोजी स्थगितीसाठीचा प्रस्ताव पाठविला होता आणि २३ जुलै २०२२ रोजी सर्व कामे स्थगित केली होती. सार्वजनिक बांधकाम विभागाला दिलेल्या पत्रानुसार २३ जुलै २०२२ रोजी जी कामे सुरू नाहीत अशी स्थगित करण्यात यावीत असे म्हटले होते.

राज्य शासन बदलल्यामुळे धोरणात्मक निर्णय बदलण्यात येऊ नये असे राज्य घटनेच्या २०२ व्या कलमात नमूद असल्याने याविरोधात ॲड. संभाजी टोपे यांच्यावतीने खंडपीठात आव्हान देण्यात आले. अर्थसंकल्पीय अधिवेशनात संबंधित कामांना मंजुरी प्रदान केली जाते. राज्यपालांच्या आदेशानुसार कामांना मंजुरी दिली जाते. त्यामुळे अशा धोरणात्मक कामात बदल करू नयेत असे संकेत आहेत. परंतु नवीन सरकारने सरळ-सरळ सर्व कामांना स्थगिती दिली. जालना जिल्ह्यातील तीन तालुक्यांना अशा प्रकारे चारशे कोटींवर निधी देण्यात आलेला आहे.

हिंगोलीचे आमदार राजू नवघरे व इतरांनी खंडपीठात याचिका दाखल करून महाविकास आघाडी सरकारच्या काळात मंजूर करण्यात आलेल्या निधीनुसार कामे व्हावीत अशी विनंती करण्यात आली. खंडपीठाने राज्याच्या मुख्य सचिवांसह नियोजन, ग्रामविकास आदिवासी, नगर विकास, मृद व जलसंधारण विभागाच्या सचिवांना नोटीस बजावण्याचे आदेश दिले होते. बुधवारी सुनावणीत खंडपीठाने निविदा स्तरावरील कामे रद्द केल्यास त्यासंबंधी खंडपीठाला माहिती द्यावी असे स्पष्ट केले. कार्यारंभादेश दिलेली कामे करण्यास प्रशासनास अडचण नसल्याचे यापूर्वीच स्पष्ट केले असल्याचे सरकारी वकील ज्ञानेश्वर काळे यांनी सांगितले.

## ‘सायबर गुन्हे हा अणुबॉम्बसारखाच धोका’

सुराज्य/मुंबई : ‘सायबर गुन्ह्यांचे समाजावर होणारे परिणाम पाहिले, तर अणुबॉम्बसारखा दूरगामी धोका आहे,’ असे मत महिला व बालविकास आणि पर्यटनमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी शनिवारी व्यक्त केले. ’रिस्पॉन्सिबल नेटिझम’ या सामाजिक संस्थेच्या दहाव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी ’महिला व बालकांच्या संदर्भातील सायबर गुन्ह्यांचा तपास’ या मार्गदर्शन पुस्तिकेचे प्रकाशन आणि सायबर संबंधित समस्यांवर मदत, मार्गदर्शन आणि समुपदेशन करणाऱ्या ’७३५३१०७३५३’ या हेल्पलाइनचे लोकार्पण करण्यात आले. गोव्याप्रमाणे महाराष्ट्रातही ’सायबर वेलनेस सेंटर’ सुरू करायच्या तयारीला लागा, असे आवाहन लोढा यांनी संस्थेच्या प्रतिनिधींना केले.

## राज्यात पुणे ठरले सर्वाधिक थंड शहर

सुराज्य/पुणे : पुणे शहरात सलग तिसऱ्या दिवशी राज्यातील नीचांकी १३.४ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली. त्यामुळे शनिवारीही पुणे राज्यातील सर्वांत थंड शहर ठरले. पुणे वेधशाळेने दिलेल्या अंदाजानुसार रविवारपासून शहरात दुपारनंतर अंशत: ढगाळ स्थिती राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे तापमानात काही प्रमाणात वाढ होऊ शकते. पुणे शहर आणि परिसरात यंदाच्या हंगामात पाच वेळा राज्यातील नीचांकी तापमानाची नोंद झाली आहे. शुक्रवारी १२.८ अंश सेल्सिअस राज्यातील नीचांकी किमान तापमानाची नोंद शहरात झाली. हे तापमान सरासरीच्या तुलनेत २.९ अंशांनी कमी होते. शनिवारी सलग तिसऱ्या दिवशीही १३.४ अंश सेल्सिअस किमान तापमान राज्यातील नीचांकी तापमान ठरले.

## सराफाच्या घरातून दीड कोटींचे दागिने लंपास

सुराज्य/पुणे : शहरातील एका सराफ व्यावसायिकाच्या घरातून दीड कोटी रुपयांचे दागिने लांबविणाऱ्या नोकरासह नऊ जणांना खंडणी विरोधी पथकाने अटक केली. चोरट्यांकडून २२ लाख ८० हजार रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला. चोरट्यांनी एका सराफ व्यावसायिकाला दागिने विकल्याचे तपासात उघडकीस आले आहे. या प्रकरणी चंदू बालाजी मेंढेवाढ (वय ३४, रा. पांडुरणा, ता. भोकर, जि. नांदेड), सारिका अप्पासाहेब सावंत (रा. काळेपडळ, हडपसर), भावना रवींद्र कोद्रे (रा. मुंढवा), जनार्दन नारा?ण कांबळे (रा. शाहूनगर, सांगली), ऋषीकेश राजाराम तोरवे (रा. जत, सांगली), दुर्गाचरण रवींद्र कोद्रे (रा. मुंढवा) यांना अटक करण्यात आली.

## राजीव गांधी हत्या; नलिनीसह पाच कैदी मुक्त

सुराज्य/नवी दिल्ली : काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या हत्या प्रकरणात दोषी ठरलेले नलिनी श्रीहरन, तिचा पती आणि इतर तीन जणांची शनिवारी संध्याकाळी तमिळनाडूच्या तुरुंगातून सुटका करण्यात आली. राजीव गांधी हत्येप्रकरणी जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या नलिनी श्रीहरन, आर. पी. रविचंद्रन यांच्यासह सहा कैद्यांच्या मुदतपूर्व मुक्ततेचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी दिले होते. तमिळनाडू सरकारने त्यांची शिक्षा माफ करण्याची शिफारस केली होती. काँग्रेसने या निकालास विरोध करून, त्याविरुद्ध दाद मागण्याचे ठरवल्याचे शुक्रवारीच जाहीर केले आहे. सर्वोच्च न्यायालयाचा आदेश मिळाल्यानंतर शनिवारी संध्याकाळी ही मुक्तता करण्यात आली.

## युद्धविरामाबाबत युक्रेनशी भारताची चर्चा

सुराज्य/नवी दिल्ली : परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी शनिवारी युक्रेनचे परराष्ट्रमंत्री दिमित्रो कुलेबा यांची भेट घेतली. यावेळी उभय नेत्यांमध्ये ताज्या घडामोडी, अण्वस्त्र वापराच्या धोक्याबाबतची चिंता आणि रशिया-युक्रेन युद्ध थांबवण्यासाठीच्या मार्गाबाबत चर्चा झाली. असोसिएशन ऑफ साउथ इस्ट एशियन नेशन्स (एएसईएएन-आसियान) आणि भारताच्या परिषदेसाठी जयशंकर हे उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्यासह कंबोडियात आले आहेत. कंबोडियाची राजधानी नोम पेन्ह येथे ही भेट झाली.

## ‘ब्लू टिक’साठी पैसे भरावेच लागणार

सुराज्य/नवी दिल्ली : बनावट खात्यांकडून गैरवापर झाल्यानंतर ट्विटरने गेल्याच आठवड्यात लॉन्च केलेली आठ डॉलर्स सबस्क्रिप्शनची ‘ब्ल्यू टिक’ सेवा शुक्रवारी स्थगित केली आहे. ही सेवा पुन्हा कधी सुरू होणार याबाबत प्रश्न विचारले जात असतानाच ट्विटरचे मालक एलॉन मस्क यांनी एक ट्वीट केले आहे.

## हवेतच दोन विमानांची धडक

सुराज्य/नवी दिल्ली : अमेरिकेच्या टेक्सासमध्ये एका ‘एअर शो’ दरम्यान दोन लढाऊ विमानांची हवेत धडक झाल्याची थरारक घटना घडली आहे. दल्लास शहरात घडलेल्या या घटनेत विमानातील सहा कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. दुसऱ्या महायुद्धातील ही लढाऊ विमाने या अपघातात पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहेत.

## ‘गांधी कुटुंबाला भेटण्याचा विचार नाही’

सुराज्य/चेन्नई : माजी पंतप्रधान राजीव गांधी हत्या प्रकरणातील दोषी नलिनी श्रीहरन, त्यांचे पती आणि इतर तिघांची तामिळनाडूतील तुरुंगातून सुटका करण्यात आली आहे. तुरुंगातून सुटल्यानंतर नलिनी यांनी प्रसारमाध्यमांना सांगितले की, सध्या आपण गांधी कुटुंबातील कोणालाही भेटण्याचा विचार करत नाही आहोत. यावेळी त्यांनी राज्य आणि केंद्र सरकारचे आभार मानले. ‘मी निर्दोष आहे या एकाच दृढविश्वासाने मला इतकी वर्षे जिवंत ठेवले’, असेही त्या म्हणाल्या.

## मुंबई-गोवा महामार्ग हा जीवघेणा प्रवास

सुराज्य/मुंबई : मुंबई-गोवा महामार्गावरील खड्ड्यांचे दुष्टचक्र थांबण्याचे काही नाव घेत नाही. गेल्या जवळपास १२ वर्षांपासून खड्ड्यांमुळे हा मार्ग नेहमीच बातम्यांमध्ये आहे. पळस्पे ते हातखांबा हा साधारण अडीचशे किमीचा महामार्ग खड्ड्यांनी भरला असून, या रस्त्यावरून प्रवास करताना वाहनचालक आणि प्रवाशांना धडकीच भरत आहे. सन २०१२ ते २०२२ या कालावधीत मुंबई-गोवा महामार्गावर एकूण ६,६९२ अपघात झाले असून, यात १,५१२ लोकांना आपला जीव गमवावा लागला आहे, असे खुद्द सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मंत्र्यांनीच सांगितले आहे.

## अभिनेत्री कल्याणी कुरळे-जाधव यांचे अपघाती निधन



सुराज्य/कोल्हापूर : ’तुझ्यात जीव रंगला’ फेम अभिनेत्री कल्याणी कुरळे-जाधव यांचे कोल्हापूर-सांगली महामार्गावरील हालोंडीनजीक डंपरने धडक दिल्याने निधन झाले आहे. कल्याणी जाधव यांनी ’तुझ्यात जीव रंगला’ या मालिकेसह अनेक लोकप्रिय मालिकांमधून आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला होता. त्यांच्या निधनाने कलाक्षेत्रावर शोककळा पसरली आहे.

## आयोगाची स्वायत्तता भाजपकडून मोडीत

सुराज्य/श्रीनगर : भाजपने निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेचा ऱ्हास केल्याचा आरोप शनिवारी पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टीच्या (पीडीपी) अध्यक्षा मेहबुबा मुफ्ती यांनी केला. आयोग आता स्वायत्त स्वतंत्र संस्था उरला नसल्याची टीका त्यांनी केली. मेहबुबा मुफ्ती यांनी अनंतनाग जिल्ह्यातील खिरम भागात पत्रकारांशी बोलताना सांगितले की, ‘हिमाचल प्रदेशात भाजप नेतृत्वाने धार्मिक आधारावर निवडणुकीचा प्रचार केला.

मुस्लिमांना उघड धमक्या दिल्या जात आहेत. पण निवडणूक आयोग मूक प्रेक्षक बनला आहे. भाजपची संमती मिळाल्यानंतरच जम्मू-काश्मीरमध्ये निवडणूक होईल. प्रशासनाच्या मुद्द्यावर मेहबुबा यांनी सांगितले की, सध्याचे सरकार सर्व निर्णय उलट फिरवत आहे. आमच्या काश्मिरी पंडितांकडे पहा. ते अनेक महिन्यांपासून जम्मूत छावण्यांत आहेत. ते काश्मीरमधील परिस्थिती सुधारेपर्यंत त्यांना जम्मूमध्ये स्थायिक करण्याची मागणी करत आहेत. पण सरकार कधी त्यांचे वेतन रोखत आहे, तर कधी त्यांना स्वस्त धान्यपुरवठा (रेशन) करणे थांबवत आहे. भाजप केवळ मते मिळविण्यासाठी काश्मिरी पंडितांच्या वेदनांचा वापर करत आहे.

## भावांमधील वादाला अखेर फुलस्टॉप!

### हिंदुजा ब्रदर्समध्ये वादाचे कारण ठरलेल्या ‘त्या’ पत्रात नेमके काय...

सुराज्य/लंडन



**ब्रिटनमधील सर्वात श्रीमंत कुटुंब, हिंदुजा कुटुंबातील वाद अखेर मिटला आहे. हिंदुजा बंधूंमधील अब्जावधी डॉलर्सच्या कौटुंबिक संपत्तीबाबत ब्रिटनच्या उच्च न्यायालयात खटला सुरू होता. पण आता त्यांनी आपापसात गुप्त करार केला आहे. लंडनमधील एका अपील न्यायालयाने आपल्या निर्णयात ही माहिती दिली.**

हिंदुजा बंधूंमध्ये ज्येष्ठ ८६ वर्षीय श्रीचंद हिंदुजा यांनी त्यांचे भाऊ जीपी हिंदुजा, पीपी हिंदुजा आणि एपी हिंदुजा यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला होता. ही बाब २ जुलै २०१४ रोजीच्या पत्राच्या वैधतेशी संबंधित आहे, ज्यात म्हटले की कोणत्याही एका भावाकडे असलेली संपत्ती सर्व भावांचीच मानली जाईल, असे या पत्रात स्पष्टपणे नमूद करण्यात आले होते. तसेच या पत्रात कोणत्याही भावाला त्याच्या दुसऱ्या भावाला एक्झिक्युटर म्हणून नेमण्याचा अधिकारही देण्यात आला होता. नोव्हेंबर २०१९ पासून यावरून कायदेशीर वाद सुरू होता. हिंदुजा बंधूंमध्ये करार झाला असल्याचे ब्रिटिश उच्च न्यायालयाला शुक्रवारी सांगण्यात आले. हिंदुजा कुटुंबातील वादाचे मूळ २०१४ मध्ये झालेला करार होता, ज्यावर चारही भावांच्या सह्या होत्या.

## तेलंगणात ‘कमळ’ फुलणार : मोदी

सुराज्य/तेलंगणा : ‘‘तेलंगणात सत्ताधारी तेलंगण राष्ट्र समितीने (टीआरएस) जनतेचा विश्वासघात केला आहे. त्यामुळे आगामी काळात राज्यात सर्वत्र ‘कमळ’ फुलणार आहे,’’ असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदींनी शनिवारी येथे व्यक्त केला. मोदींचे तेलंगणामध्ये शनिवारी दुपारी आगमन झाले. त्यांच्या हस्ते अनेक विकास प्रकल्पांचे उद्घाटन व काही प्रकल्पांची पायाभरणी करण्यात आली. तसेच रामागुंडम येथील खतप्रकल्प राष्ट्राला समर्पित करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. २०२३ च्या राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदींनी ‘टीआरएस’ला शनिवारी लक्ष्य केले.

‘टीआरएस’चे नाव न घेता मोदी म्हणाले की, ‘राज्य सरकार व त्यांचे नेते तेलंगणाच्या क्षमतेवर व लोकांच्या प्रतिभेवर अन्याय करत आहेत. माहिती-तंत्रज्ञानासाठी ओळखल्या जाणाऱ्या हैदराबादमध्ये अंधश्रद्धा जोपासल्या जात आहेत. ज्या राजकिय पक्षावर तेलंगणाचा प्रचंड विश्वास होता, त्यानेच नागरिकांचा विश्वासघात केला आहे. राज्यात मिळणाऱ्या संकेतानुसार येथे लवकरच ‘कमळ’ (भाजपची सरशी होणार) फुलणार आहे.’

## कायदा हे दमनाचे शस्त्र ठरू नये : सरन्यायाधीश चंद्रचूड

**सुराज्य/नवी दिल्ली : ‘कायदा हा दमनाचे शस्त्र होऊ नये याची काळजी सर्वांनी घेण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन नवनियुक्त सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी शनिवारी येथे केले. एका माध्यम समूहाने आयोजित केलेल्या परिषदेत ते बोलत होते.’**



सर्वसामान्य नागरिकांच्या कायद्याकडून मोठ्या अपेक्षा असतात; परंतु आपण एक संस्था म्हणून न्यायालयांची क्षमता व मर्यादा समजून घेण्याची गरज आहे. केवळ न्यायाधीशच नव्हे, तर निर्णय घेण्याचा अधिकार असणाऱ्या प्रत्येकाने कायदा हे दमनाचे शस्त्र होऊ नये याची काळजी घ्यायला हवी. कायद्याच्या माध्यमातून केवळ न्यायच मिळायला हवा, असे ते म्हणाले. यासाठी त्यांनी ब्रिटिशराजचा दाखला दिला. आपल्या देशात ब्रिटिशांचे राज्य होते त्यावेळीही हेच कायदे होते. मात्र, त्यांचा वापर कशासाठी केला गेला, हे आपल्याला माहीत आहे. त्यामुळे नागरिकांनीही कायद्याचा वापर हा योग्य हेतूंसाठीच करायला पाहिजे, असे त्यांनी नमूद केले.

आपल्या देशातील न्यायसंस्थेला प्रदीर्घ परंपरा आहे. करुणेची भावना, सहानुभूती व सर्वसामान्यांच्या आक्रोशाचे निराकरण करण्याची क्षमता यामुळे आपली न्यायसंस्था टिकून आहे. तुम्ही जेव्हा दबलेल्यांचा आवाज ऐकाल व चेहरा नसणाऱ्यांनादेखील आपल्या यंत्रणेमध्ये स्थान द्याल; तसेच तुम्ही कायदा व न्याय यामध्ये संतुलन साधू शकाल तेव्हाच तुम्ही खऱ्या अर्थाने न्यायाधीशाची भूमिका निभावू शकाल,’ असेही ते न्यायाधीशांना उद्देशून म्हणाले. सोशल मीडियामुळे न्यायालयात क्षणोक्षणी काय घडते ते सर्वांना समजू शकते. एखादा न्यायाधीश सुनावणीदरम्यान काय बोलला हेदेखील क्षणभरात कळू शकते. त्यामुळे एक न्यायाधीश म्हणून तुमचे सतत मूल्यांकन होत असते,’ याकडे त्यांनी लक्ष वेधले.

## बैलगाडा शर्यतीच्या वादातून मोठा राडा

### दोन गटात दिवसाढवळ्या अंधाधुंद गोळीबार

सुराज्य/मुंबई : अंबरनाथमधून अंबरनाथमध्ये बैलगाडा शर्यतीच्या वादातून अंधाधुंद गोळीबार झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. अंबरनाथ एमआयडीसीतील सुदामा हॉटेलजवळ गोळीबाराची घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

सदर घटनेनंतर पोलीस घटनास्थळी पोहोचले आहेत. याप्रकरणी पुढील तपास सुरु केला आहे. पनवेलमधील पंढरी फडके आणि कल्याणचे राहुल पाटील ही दोन नावे बैलगाडा शर्यतीत नेहमीच चर्चेत राहिले आहेत. या दोन व्यक्तींमुळे संपूर्ण बैलगाडा शर्यतींना गालबोट लागण्याचा प्रकार याआधी देखील घडला होता. गेल्या वर्षीचा मोसमात या दोन्ही गटातील बैलगाडींना प्रवेश नाकारण्यात आला होता.

## ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी शेट्टी मैदानात

### एकरकमी एफआरपीसाठी राज्यव्यापी आंदोलनाची हाक

**सुराज्य/कोल्हापूर : ऊसाला देण्यात येणाऱ्या एफआरपीचे सूत्र बदला, साखरेचे दर क्विंटलला ३५०० रूपये करा, निर्यातीस खुला परवाना द्या, इथेनॉलला लिटरला पाच रूपये वाढवून द्या, यासह विविध मागण्यांसाठी राज्यात १७ आणि १८ नोव्हेंबर रोजी दोन दिवस ऊसतोड बंद आंदोलन करण्यात येणार आहे, अशी माहिती स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष, माजी खासदार राजू शेट्टी यांनी दिली.**



शेट्टी यांनी सांगितले की, एफआरपी जाहीर करताना आधारभूत किंमत विचारात घेतली जाते. पण अलिकडे इथेनॉल निर्मितीमुळे कारखान्यांचा फायदा वाढला आहे. त्याचा विचार एफआरपी ठरवताना केला जात नाही. यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होते. म्हणून यापुढे त्यामध्ये बदल करावा. या मागणीसाठी कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष विजय पॉल यांची भेट घेतल्याचेही त्यांनी सांगितले.

महाविकास आघाडी सरकारने एफआरपी दोन टप्प्यात देण्याचा कायदा केला आहे, हिवाळी अधिवेशनात त्यामध्ये बदल करून एक टप्प्यात देण्याचा निर्णय नव्या सरकारने घ्यावा, अशी मागणी करून शेट्टी म्हणाले, बहुतांशी कारखान्यांचे वजनकाटे संशयास्पद आहेत. त्यामुळे ते सर्व संगणकीकृत करून ऑनलाईन करावेत यासह इतर मागण्यांकडे केंद्र व राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी दोन दिवस ऊसतोड आंदोलन करण्यात येणार आहे.

दि. १७ आणि १८ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या या आंदोलनात सर्व शेतकरी, वाहतूकदार, मजुरांनी सहभागी व्हावे, कारखान्यांनीदेखील याला प्रतिसाद द्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी प्रदेशाध्यक्ष जालिंदर पाटील, अनिल मादनाईक उपस्थित होते. ऊस दरावरून स्वाभिमानी शेतकरी संघटना आक्रमक झाली आहे. येत्या १७ आणि ११८ नोव्हेंबरला राज्यात ऊसतोड बंद आंदोलन करण्यात आला असून या दिवशी संपूर्ण राज्यात ऊसतोड बंद राहणार असून यामध्ये साखर कारखान्यांनी ही सहकार्य करावे असे आवाहन राजू शेट्टी यांनी केले आहे.

## कस्टम विभागाची मोठी कारवाई!

### मुंबई विमानतळावर तब्बल ३२ कोटी रुपयांचे सोने जप्त

सुराज्य/मुंबई: कस्टम्सच्या एअर इंटेलिजन्स युनिटने शुक्रवारी मुंबई विमानतळावर ३२ कोटी रुपयांचे तब्बल ६१ किलो सोने जप्त केले आहे. याप्रकरणी सात आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.

अटक करण्यात आलेले आरोपी हे कतार एअरवेजच्या विमानाने मुंबईत आले होते. सर्व आरोपी प्रवासी होते. त्यांना भारतात सोने आणण्यासाठी पैशांचे आमिष दाखवण्यात आले होते. परंतु, त्यांना भारतातील सीमाशुल्क कायद्याबाबत माहिती नव्हती. त्यामुळे हे सर्व जण एवढं सोनं घेऊन आले. पोलिसांनी अटक केल्यानंतर सर्व आरोपींना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

## खाकी वर्दीला सलाम!

# १२ वर्षीय चिमुकला पुन्हा आईच्या कुशीत

### अपहरणानंतर अवघ्या ७५ तासांत सुटका

सुराज्य/डोंबिवली

**दीड कोटी रुपयांच्या खंडणीसाठी १२ वर्षीय मुलाचे अपहरण करण्यात आल्याची घटना डोंबिवली शहरात उघडकीस आली आहे. मुलगा बेपत्ता झाल्याची तक्रार येताच २०० पेक्षा अधिक पोलीस कर्मचाऱ्यांची २० पथक बनवून तीन दिवस शोध मोहीम राबवल्यानंतर अखेर सुरत येथून आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. अटक करण्यात आलेले आरोपी हे सराईत गुन्हेगार असून मुलाचे अपहरण केल्यानंतर ते विविध राज्यांमध्ये फिरत होते, असेही स्पष्ट झाले आहे.**



डोंबिवलीतील १२ वर्षीय मुलाचे अपहरण केल्यानंतर नाकाबंदीत पकडले जाऊ नये यासाठी आरोपी मुख्य मार्ग सोडून गावातील अंतर्गत मार्गातून ये-जा करत होते. मात्र, ठाणे जिल्हा, नाशिक जिल्हा, पालघर जिल्हा, सिल्वासा व गुजरात पोलिसांनी मिळून मुलाची सुटका करत आरोपींना अखेर ताब्यात घेतले आहे.

पोलिसांच्या भीतीने आरोपी गाड्या सोडून जंगलात पळून गेले होते. त्यानंतर आरोपींच्या शोधासाठी पोलिसांनी ५० हजार रुपयांचे बक्षीस जाहीर करत स्थानिक नागरिकांची मदत घेतली.

दरम्यान, ७५ तासांनंतर पोलिसांनी दोन पुरुषांसह तीन महिलांना अटक केली आहे. फरहशहा फिरोजशहा रफाई, प्रिस कुमार सिंग, शाहीन मेहतर, फरहिंद सिंग आणि नाझिया रफाई अशी या अपहरण करणाऱ्या आरोपींची नावे आहेत. दरम्यान, अपहरण करणाऱ्या आरोपींवर याआधी हत्या, दारूची तस्करी व घरफोडी असे अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत.




# धाड पडते धडाधडा
# ईडी पिडा लागता लोळतो गडागडा



सध्या 'ईडी' आणि 'पीएमएलए' या दोन शब्दांची महाराष्ट्रातील गल्लीबोळातही चर्चा आहे. काल तिथे ईडीची धाड पडली आणि इथे ईडीने कारवाई केली, काल तो सापडला, आज त्याला ईडीची नोटीस आली आदी बातम्यांनी दररोजची वर्तमानपत्रे रंगू लागली आहेत. 'ईडी'ने अटक केली की 'पीएमएलए' कोर्टाने कोठडी सुनावली आणि अटकेतील आरोपी महिनोन्‌महिने तुरुंगात खितपत पडलाच म्हणून समजायचे. इतरवेळी आयएएस आणि आयपीएस सारख्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवरही रुबाब दाखवणारे आमदार, खासदार आणि मंत्रीसुध्दा ईडीचे नाव काढले की थरथर कापायला लागतात. सध्या ईडीची इतकी दहशत आहे की या दहशतीखाली सत्तेच्या सिंहासनाचीही उलथापालथ झाली. एवढी जबरदस्त धडकी भरवणारी ईडी आहे तरी काय? ईडीकडे इतकी सुपर पॉवर आली कुठून? पीएमएलए कोर्ट म्हणजे तरी काय? या सगळ्या प्रश्नांची उत्तरे समजावून घ्या आजच्या 'सुराज्य'च्या 'मंडे मॉर्निंग' मधून...

## पीएमएलए म्हणजे काय?





पीएमएलए (Prevention of Money Laundering ct) म्हणजेच आर्थिक गैरव्यवहार प्रतिबंधक कायदा. अवैध मार्गाने कमावलेल्या काळ्या पैशाचे कायदेशीर मार्गाने कमावलेल्या पैशात रूपांतर करणे म्हणजेच काळा पैसा पांढरा करणे आहे. यालाच मनी लॉँड्रिंग म्हणतात. अर्थात मनी लॉँड्रिंग म्हणजे बेकायदेशीरपणे कमावलेला पैसा लपवण्याचा एक मार्ग आहे. अवैध पैशांचा हा गैरवापर रोखण्यासाठी मनी लॉँड्रिंग प्रतिबंधक कायदा लागू करण्यात आला आहे.

## मनी लॉँड्रिंग प्रतिबंध कायदा (पीएमएलए) काय आहे?




पीएमएलए हा एक फौजदारी स्वरूपाचा कायदा आहे. याअंतर्गत तपास इतर गुन्हेगारी प्रकरणांनुसारच करण्यात येतो. हा कायदा मनी लॉँड्रिंग रोखण्यासाठी आणि त्यात गुंतलेली मालमत्ता जप्त करण्यासाठी लागू करण्यात आला आहे. या अंतर्गत सरकार किंवा सार्वजनिक प्राधिकरणाला बेकायदेशीरपणे मिळवलेले पैसे आणि मालमत्ता जप्त करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. मनी लॉँड्रिंग प्रतिबंधक कायदा (झचङअ) २००२ मध्ये मंजूर करण्यात आला. त्यानंतर १ जुलै २००५ रोजी हा कायदा लागू करण्यात आला. मनी लॉँड्रिंग पूर्णपणे थांबवणे हा या कायद्याचा मुख्य उद्देश आहे. याशिवाय, आर्थिक गुन्ह्यांमध्ये काळ्या पैशाचा वापर रोखणे, मनी लॉँड्रिंगमध्ये गुंतलेली किंवा मिळवलेली मालमत्ता जप्त करणे आणि मनी लॉँड्रिंगशी संबंधित इतर गुन्ह्यांबाबत कारवाई करून असे प्रकार कायमचे संपवणे हा या कायद्यामागील उद्देश आहे.

## ईडी आणि पीएमएलएचा काय संबंध आहे?



विदेशी मुद्रा व्यवस्थापन अधिनियम १९९९ (फेमा) आणि मनी लॉँड्रिंग प्रतिबंधक कायदा २००२ (पीएमएलए) या दोन कायद्यांचे पालन संस्थेमार्फत केले जाते. मनी लॉँड्रिंगवर प्रतिबंध आणणे, काळा पैसा वापरणाऱ्यांवर कारवाई करणे, काळा पैसा वापरून जमवलेली मालमत्ता जप्त करणे आणि संबंधित प्रकरणाचा तपास करण्याचे काम ईडीकडून पीएमएलए कायद्याअंतर्गत केले जाते. ईडी ही एक इकॉनॉमिक्स इंटेलिजन्स एजन्सी असल्यामुळे देशातील हवाला, मनी लॉँड्रिंग, भ्रष्टाचार यांसारख्या गोष्टींवर ईडी नजर ठेवते. सीबीआय, आयकर विभाग, पोलीस अशा कोणत्याही यंत्रणांनी आर्थिक गैरव्यवहार संबंधी गुन्हा दाखल केला असल्यास अशा प्रकरणांची चौकशी करण्याचा अधिकार ईडीला आहे. संबंधित पैसा कुठून आला? आर्थिक व्यवहार कसा झाला? यासंदर्भात ईडी समन्स पाठवून चौकशी सुरू करते किंवा स्पष्टीकरण विचारते. चौकशीदरम्यान इन्कम सोर्स स्पष्ट नसल्यास संबंधित मालमत्ता ईडी जप्त करू शकते. या प्रकरणांची सुनावणी विशेष न्यायालयात होते. अशा विशेष न्यायालयाची निर्मिती ही पीएमएलए कायद्यानुसार झालेली असते अशा न्यायालयास पीएमएलए न्यायालय असे म्हटले जाते.




## ईडी (Enforcement Directorate) म्हणजे काय?

ईडी (अंमलबजावणी संचालनालय) ही एक केंद्रीय तपास संस्था आहे. देशातील आर्थिक गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी दि.१ मे १९५६ रोजी ईडीची स्थापना करण्यात आली. ही संस्था अर्थ मंत्रालयाच्या महसूल विभागाअंतर्गत येतो. अंमलबजावणी संचालनालय पीएमएलए या कायद्यातील कलमांनुसार काम करते.



## काय शिक्षा होते?

पीएमएलए अंतर्गत दोषींना ३ ते ७ वर्षांपर्यंत तुरुंगवासाची शिक्षा सुनावली जाऊ शकते. शिवाय संबंधित आरोपी इतरही कायद्याअंतर्गत दोषी आढळल्यास १० वर्षांपर्यंतची शिक्षा होऊ शकते. या प्रकरणाशी संबंधित संपत्ती, पैसा ईडी आपल्या ताब्यात घेते.

## मनी लॉँड्रिंग कसे होते?



- मनी लॉँड्रिंग म्हणजे बेकायदेशीर पैसा कायदेशीर करणे आणि वापरात आणणे. थोडक्यात काळा पैसा पांढरा करणे.
- कायद्यानुसार, काळा पैसा कायदेशीर करण्यासाठी वापरात आणला गेला किंवा अर्थव्यवस्थेत किंवा बाजारात आणला तर त्याला मनी लॉँड्रिंग असे म्हणतात.
- उदा. तुम्ही १० रुपये रोख देऊन समोरच्या व्यक्तीकडून १० लाख रुपयांचा चेक घेतला तर हे सुध्दा एक प्रकारचे मनी लॉँड्रिंग आहे.
- तुमच्या आर्थिक व्यवहारात पारदर्शकता नसेल किंवा इन्कम सोर्स तुम्हाला सांगता येत नसेल तर तुम्ही याप्रकरणी अडचणीत येऊ शकता.
- शेल कंपन्या उभारणे, अनेक कंपन्यांमध्ये पैसे गुंतवले आहेत असे दाखवणे, नफ्याचे पैसे नसताना तसे दाखवणे, खोटे व्यवहार दाखवणे, अशा अनेक पद्धतींनी मनी लॉँड्रिंग केले जाते.




## कौणत्या नेत्यांविरोधात झाली कारवाई?

महाराष्ट्रात सध्या १० पेक्षा अधिक राजकीय नेत्यांची ईडी चौकशी सुरू आहे.

१. महाराष्ट्र सदन घोटाळा प्रकरणी छगन भुजबळ जवळपास दोन वर्षे तुरुंगात होते.

२. माजी गृहमंत्री अनिल देशमुख आणि माजी अल्पसंख्याक मंत्री नवाब मलिक हे महाविकास आघाडी सरकारचे दोन मंत्री मनी लॉँड्रिंग प्रकरणी सध्या तुरुंगात आहेत.

३. विजय माल्या, नीरव मोदी, रॉबर्ट वढेरा अशा अनेकांवर पीएमएलए अंतर्गत कारवाई किंवा चौकशी झालेली आहे.

४. शिवसेनेच्या खासदार संजय राऊत यांना नुकताच ईडीच्या गुन्ह्यातून जामीन मिळाला आहे.



## जामीन मिळणे कठीण का आहे?

ईडीने अटक केल्यानंतर पीएमएलए कायद्यानुसार पोलीस कोठडी घेतली जाते. ती संपल्यानंतर आरोपीची रवानगी न्यायालयीन कोठडीत होते. त्यानंतर जामीन मिळणे या कायद्यानुसार फारच कठीण आहे. पीएमएलए कलम ४५ नुसार या प्रकरणात जामीन मिळण्यासाठी दोन अटी आहेत. याला कायदेशीर भाषेत ट्वीन कंडिशन (TWIN CONDITION) असे म्हटले जाते.

१) जामीन मिळवण्यासाठी दोषी नसल्याचे सिध्द करणे

२) आरोपी भविष्यातही असा कुठलाही गुन्हा करू शकत नाही हे न्यायालयाला पटवून देणे.

३) भविष्यात असा गुन्हा करू शकत नाही हे पटवून देण्यासाठी संबंधित आरोपीने यापूर्वी एकही गुन्हा केलेला नाही, आरोपीचं रेकॉर्ड स्वच्छ आहे, आरोपी भविष्यात अशाप्रकारचा कोणताही गुन्हा करणार नाही, असे सांगण्याचा प्रयत्न केला जातो.

४) अशा प्रकरणांमध्ये राजकीय नेत्यांना जामीन मिळणे कठीण असते. कारण बहुतांश राजकीय नेत्यांचे रेकॉर्ड स्वच्छ नसते. त्यांच्याविरोधात कुठल्या ना कुठल्या गुन्ह्यांची नोंद झालेली असते किंवा चौकशी सुरू असते. परिणामी कलम ४५ नुसार जामीन मिळणे राजकारण्यांसाठी कठीण असते.

## पीएमएलए कायद्याअंतर्गत अंतर्गत कौणावर कारवाई होऊ शकते?

बेकायदेशीर शस्त्रास्त्रांचा पुरवठा, अंमली पदार्थांची तस्करी आणि त्यांच्यामार्फत पैसे कमावणाऱ्यांनाही मनी लॉँड्रिंगच्या गुन्ह्यात दोषी ठरवले जाऊ शकते. २०१२ मध्ये केलेल्या दुरुस्तीनुसार, झचङ सर्व वित्तीय संस्था, बँका, म्युच्युअल फंड, विमा कंपन्या आणि त्यांच्या आर्थिक मध्यस्थांना देखील लागू आहे. २०१९ मध्येही या कायद्यात काही सुधारणांच्या रूपात बदल करण्यात आले. यानुसार, ज्या लोकांचा किंवा संस्थांचा गुन्हा पीएमएलए अंतर्गत नाही अशा लोकांवरही ईडीकडून कारवाई केली जाऊ शकते.







## पीएमएलए अंतर्गत कारवाई कशी होते?

- ब्लॅक मनी वापरून एखादी मालमत्ता उभी केली किंवा बेनामी संपत्ती असल्यास पीएमएलए कायद्याअंतर्गत कारवाई होते आणि तशी शंका ईडीला आल्यास ते संबंधितांकडे स्पष्टीकरण मागू शकतात किंवा ती संपत्ती जप्त करतात. अशावेळी मनी लॉँड्रिंग करणाऱ्यास ईडीकडून अटकही केली जाऊ शकते.
- कलम ३ - नुसार जाणीवपूर्वक किंवा अनावधानाने किंवा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या गुन्हेगारीतून पैसा कमवणाऱ्यांविरोधात आणि त्यातून संपत्ती घेणाऱ्यांविरोधात व या प्रक्रियेत सहभागी असलेल्या सर्व लोकांविरोधात एफआयआर नोंदवला जातो.
- कलम ११ - नुसार ईडीचे अधिकारी समन्स पाठवू शकतात. एखाद्याकडे बेनामी संपत्ती आहे किंवा मनी लॉँड्रिंगचा संशय आहे अशाला चौकशीसाठी समन्स पाठवता येते.
- कलम १७ - नुसार मालमत्ता जप्त करता येते. एखादी इमारत ईडीने जप्त केली तर इमारत बांधण्यासाठी पैसे कुठून आले? त्याचा इन्कम सोर्स काय आहे? हे ईडीला पटवून द्यावे लागते. म्हणजेच एखाद्याविरोधात पीएमएलए अंतर्गत चौकशी सुरू झाल्यास संबंधित व्यक्तीला मी दोषी नाही हे सिद्ध करावे लागते.
- कलम १९- नुसार अतिरिक्त संचालक या पदावरील अधिकाऱ्याला 'पॉवर टू अरेस्ट' म्हणजे पीएमएलए कायद्यानुसार अटक करण्याचा अधिकार दिला आहे. संशयिताला काही प्रश्न विचारल्यानंतर पुरेसे पुरावे आहेत असे सांगून अधिकारी अटक करू शकतात.

